वृक्षवल्ली आम्हासोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

**वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**

वनवसाहत, नवीन प्रशासकीय इमारत, 1 ला माळा, चुन्नीलाल पेट्रोल पंपच्या मागे, न्यु उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर -431 005

दूरध्वनी क्र. 0240-2950444 ई-मेल - jdsfdaur@gmail.com

जा.क्र.सावऔ/योजना/५०२ /2024-25 छत्रपती संभाजीनगर दि.२८/01/2025.

**प्रति,**
मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(सामाजिक वनीकरण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :** अभिसरण योजने अंतर्गत काम करताना येणाऱ्या अडचणींबाबत

**संदर्भ :** १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा.नागपूर यांचे अध्यक्षतेखालील दिनांक १८/१२/२०२४ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे आयोजित आढावा बैठक.
२) विभागीय वन अधिकारी, (सा.व.) विभाग, धाराशिव यांचे पत्र क्र.अ/साववि/आस्था/७२१ दि.२७.०१.२०२५
३) विभागीय वन अधिकारी, (सा.व.) विभाग, लातूर यांचे.पत्र क्र.अ/साववि/आस्था/विचौ/४०८ दि.०६/०१/२०२५.
४) विभागीय वन अधिकारी, (सा.व.) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडील पत्र क्र.अ/साववि/योजना/७०८ दि.२७/०१/२०२५.
५) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, हिंगोली यांचेकडील पत्र क्र.अ/साववि/योजना/अभिसरण/७८९, दि.२७/०१/२०२५.
६) विभागीय वन अधिकारी, (सा.व.) विभाग, नांदेड यांचे पत्र क्र.अ/सावबि-नां/योजना-अभि/५२१ दिनांक २७/०१/२०२५
७) विभागीय वन अधिकारी, (सा.व.) विभाग, जालना यांचे पत्र क्र.अ/सावबि/योजना/ ३८५ दि.२७.०१.२०२५
८) विभागीय वन अधिकारी (सा.व.) विभाग, परभणी यांचे पत्र क्र.अ/सावबि/योजना/ ३४६ दि.२७.०१.२०२५

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भास अनुसरुन सादर असे की, अभिसरण योजनेअंतर्गत कामे करताना क्षेत्रिय स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी तसेच त्यास अनुसरुन करावयाच्या आवश्यक उपाययोजना / मागणी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बाब | अडचणी |
|---|---|---|
| १ | मजुरांची उपलब्धता | औद्योगिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, शहरीकरण व नागरीकरण झालेले क्षेत्र, महानगरपालिका शहरालगतचे क्षेत्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामूळे अशा क्षेत्रालगत असणाऱ्या प्रस्तावित रोपवाटीका व रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड तसेच गटलागवड या कामांसाठी स्थानिक जॉब कार्ड धारक मजूर सहजरीत्या उपलब्ध होत नाहीत. सन २०२४ च्या पावसाळयात बहूतांश ठिकाणी मजूर उपलब्ध न झाल्यामुळे रोपे लागवडीची कामे श्रमदानातून/ लोकसहभागातून करण्यात आली. तसेच मजूर उपलब्ध न झाल्यामुळे मरळ भरणे, निंदणी, खते देणे, रोपांचे संगोपन व देखभाल इ. प्रथम वर्षीय कामे बहुतांश ठिकाणच्या रोपवनात करता आलेली नाहीत. त्यामुळे रोपवन अयशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>तसेच शेतीची कामे व रोपवनाची लागवड एकाच वेळी असल्याने शेतीच्या कामावर मजूरांना प्रति दिवशी रु.५००-१००० पर्यंत मजुरी मिळते. त्यामानाने अभिसरणांतर्गत मजूरीचा दर कमी असल्याकारणाने, मजूरांचा शेतीच्या कामाकडे कल दिसून येतो. |

| | | |
|---|---|---|
| २ | हजेरीपत्रकातील मजूर कामावर न आल्यास | मग्रारोहयो अंतर्गत काम करण्यास इच्छुक असणाऱ्या स्थानिक मजुरांची कामाची पूर्व मागणी नमुना क्र. 04 मधे नमूद करून 07 दिवसांचे हजेरीपत्रक निर्गमित करावे लागते. त्यानंतर मजूर प्रत्यक्ष कामावर न आल्यास ऐनवेळी अन्य मजूर उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होवुन त्याचा वनीकरण कामावर दुष्परिणाम होतो.<br>सन २०२४ च्या पावसाळयात करावयाच्या वृक्ष लागवडीकरीता पूर्व पावसाळी कामावर करण्यात आलेला खर्च विचारात घेऊन व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन प्रथम वर्ष रोपलागवडीचे कामे बहुतांश ठिकाणी स्थानिक जॉबकार्ड धारक मजूर विहीत कालावधीत उपलब्ध न झाल्यामुळे श्रमदानातून/लोकसहभागातून करण्यात आली आहेत. |
| ३ | अकुशल (मजुरी) निधीची उपलब्धता. | मनरेगा अंतर्गत केंद्र शासनाने प्रत्येक जॉबकार्ड धारकास १०० दिवस रोजगाराची हमी दिली आहे. त्यानुसार १०० दिवसांची मजुरीची अदायगी ही केंद्र शासनाच्या मार्फत दिली जाते. त्यानंतर मजुरीचे प्रदान हे राज्य शासनामार्फत केले जाते. परंतु बरेचदा केंद्र / राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मजुरीस विलंब होत असल्यामुळे मजूर मनरेगाच्या कामावर येण्यास फारसे इच्छूक नसतात.<br>हजेरीपत्रकाचा कालावधी संपल्यावर पुढील आठ दिवसांत मजूरांची मजूरी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होणे बंधनकारक आहे. मात्र सदरची मजूरी रक्कम विलंबाने प्राप्त होत असल्याने मजूर कामावर येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. |
| ४ | वृक्षलागवड व अभिसरण अंतर्गत इतर अनुज्ञेय कामे यातील फरक | सद्यस्थितीत मनरेगा अंतर्गत एकूण २६३ कामे अनुज्ञेय आहेत. त्यातील २८ कामे ही अभिसरण पद्धतीने केली जातात. उदा. शालेय स्वयंपाक गृह निवारा, नाला मोरी बांधकाम, गोदाम, सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक रस्ता, डांबर रस्ता, शाळेकरिता/ मैदानाकरिता साखळी कुंपण, अंगणवाडी काम, ग्रामपंचायत भवन, नॅडेप कंपोस्ट ई.<br>सदरील कामांचे स्वरुप हे छोट्या बांधकामाचे आहे.<br>कामाचे स्थळ हे प्रामुख्याने गावातीलच असते.<br>कोणतेही काम हे ऋतुमानावर अवलंबून नाही.<br>कामाचा कालावधी हा साधारणतः १ महिन्याचा असतो.<br>याउलट रस्ता दुतर्फा वृक्षलागवड व गट लागवड कामे ही<br>* नियमित स्वरूपाची असून त्याचा कालावधी हा ३ वर्षाचा असतो.<br>* ऋतूमानावर अवलंबून असतात.<br>* रोपवनाच्या वेळापत्रकानुसार ते विहित कालावधीतच पूर्ण करावी लागतात. स्थानिक पातळीवर वैयक्तिक लाभाची कामे मोठया प्रमाणावर सुरु असल्याने, वृक्ष लागवडीच्या कामावर (सार्वजनिक स्वरुपाच्या कामावर) स्थानिक जॉबकार्ड धारक मजूर उपलबध होत नाहीत.<br>* सदरील कामात मजूर अनुपल्बधतेमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव खंड पडल्यास वृक्षलागवड कामे भविष्यात अयशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. |
| ५ | कुशल खर्चाबाबत | वनीकरण आणि मृद व जलसंधारणाची कामे यशस्वी करण्याकरीता अकुशल निधी सोबतच रोपवाटिका खर्च, रोपे वाहतूक, सिंचित रोपवन नमुन्यानुसार व टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, काटेरी कुंपण, ट्री गार्ड खरेदी, निंदणीच्यावेळी खत देणे, सर्वे/सीमांकन/आखणी या बाबीवरील साहित्य खर्च, मजूर कल्याण व आकस्मिक खर्च ई. कुशल बाबींचा निधीदेखील वेळेवर प्राप्त होणे तेवढेच आवश्यक असते.<br>सद्यस्थितीत मनरेगातंर्गत यापूर्वी करण्यात आलेल्या रोपवाटीका व रोपवन कामांबाबतचा कुशल भागाचा निधी मोठ्या प्रमाणावर निधी अद्यापही या विभागास प्राप्त झालेला नाही व या संदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.<br>दि.२८ जुलै, २०२३ च्या अभिसरणाच्या शासन निर्णयानुसार वनीकरणाच्या कामांपैकी रोपवाटीकांची कुशल कामे ही केवळ योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीमधुन पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. वेळीच कुशल निधी प्राप्त न झाल्यास कामाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६ | अभिसरण व योजनेतंर्गत मजुरीची अदायगीबाबत. | अभिसरण योजनेतंर्गत मनरेगा व योजनेची मजुरी एकाचवेळी वितरीत करणे अत्यावश्यक आहे. मनरेगातंर्गत १०० दिवसावरील निधी बरेचदा विलंबाने प्राप्त होत असल्यामूळे मनरेगा व योजनेतंर्गत एकाच वेळी समन्वय साधून मजुरी अदा करण्यास विलंब होईल.<br>शिवाय अभिसरणातंर्गत मनरेगा अथवा योजना यापैकी कोणतीही एकाची मजुरी अदा केल्यास मजुरांच्या मनात संभ्रम निर्माण होवुन त्यातुन क्षेत्रीय अधिकारी व मजूर यांच्यात वाद-विवाद उत्पन्न होवुन परिणामी वनविभागाविषयीची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. |
| ७ | नमूना अंदाजपत्रकाची निवड | १. प्रचलीत शासन निर्णयातील तरतुदींनुसार, अभिसरण योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये मनरेगा अंतर्गत घेण्याचा अकुशल (Part-A) व कुशल (Part -B) त्याचप्रमाणे वनविभागाच्या योजनेमधून घेण्याचा कूशल भागाचा (Part -C) याप्रमाणे अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे.<br>२. यासंदर्भात दिनांक २८ जुलै २०२३ रोजी निर्गमित शासन निर्णयात प्रचलित नमूना अंदाजपत्रकाची निवड करुन अभिसरणांतर्गत विविध कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि त्यानुसार कोणतीही नमूना अंदाजपत्रके सहपत्रीत करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रके तयार करुन जिल्हास्तरीय छाननी समितीकडे मान्यतेस्तव सादर केल्यावर ऐनवेळी तांत्रिक प्रश्न- कुशल-अकुशल मनरेगा अंतर्गत तसेच वनविभागाच्या योजनांतर्गत तरतुदीमधुन घेण्याच्या कुशल व अकुशल भाग याबाबत स्पष्टता होत नसल्याची कारणे दर्शविण्यात येऊन कालापव्यय होतो. ही वस्तुस्थिती आहे. |
| ८ | अभिसरण समितीच्या मान्यतेबाबत | दिनांक २८ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार विभागाची जवळपास सर्वच कामे ही मनरेगा अभिसरणच्या कक्षेत आली आहे त्यामूळे शा.नि.क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/ मग्रारो-१ दि.०५ नोव्हेंबर २०१८ व शा.नि.क्र. मग्रारो-२०२१/ प्र.क्र.२६ रोहयो-१०अ दि.३०/०३/२०२१ नुसार विभागा-मार्फत प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांच्या आराखड्यास जिल्हास्तरीय अभिसरण समितीची मान्यता असणे आवश्यक आहे. परंतू उक्त नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन जिल्हास्तरीय अभिसरण समितीच्या स्वतंत्र मान्यता देण्याच्या कार्यपध्दतीचा अवलंब न झाल्यास त्याबाबत नेमक्या अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत स्पष्टता नाही. तसेच जिल्हास्तरीय छाननी समितीची बैठक वेळेवर न झाल्याने, मान्यताही विहीत कालावधीमध्ये मिळत नाही. |
| ९ | अंदाजपत्रकामध्ये विविध कारणास्तव जसे की, सुधारीत प्र.मा., कुशल अकुशल भागातील बदल इत्यादी कारणास्तव सुधारणा झाल्यास DPR Unfreeze करणेबाबत. | दिनांक २८ जुलै २०२३ रोजी निर्गमित शासन निर्णयात प्रचलित नमूना अंदाजपत्रकाची निवड करुन अभिसरणांतर्गत विविध कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि त्यानुसार कोणतीही नमूना अंदाजपत्रके सहपत्रीत करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रके तयार करुन जिल्हास्तरीय छाननी समितीकडे मान्यतेस्तव सादर केल्यावर ऐनवेळी तांत्रिक प्रश्न- कुशल-अकुशल मनरेगा अंतर्गत तसेच वनविभागाच्या योजनांतर्गत तरतुदीमधुन घेण्याच्या कुशल व अकुशल भाग याबाबत स्पष्टता होत नसल्याची कारणे दर्शविण्यात येऊन कालापव्यय होतो. ही वस्तुस्थिती आहे. यासोबतच अंदाजपत्रकामध्ये विविध कारणास्तव जसे की, सुधारीत प्र.मा., कुशल - अकुशल भागातील बदल इत्यादी कारणास्तव सुधारणा झाल्यास शासन परिपत्रक / म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. / परिपत्रक दिनांक १४/०४/२०१४ अन्वये राज्यस्तरावर State DBA Login मधून सदर कामांच्या वर्क कोडचे DPR Unfreeze करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हास्तरावरुन कार्यवाही करता येत नसल्यामुळे नरेगा आयुक्त, नागपूर यांचेस्तरावरुन Online कार्यवाही पुर्ण झाल्याशिवाय पुढील कामे विहीत मुदतीत करता येत नाहीत. |
| १० | रस्तादुतर्फा वृक्ष लागवडीबाबत. | रस्ता दुतर्फा रोपवनाच्या बाबत रस्त्याचे क्षेत्र हे बरेचदा एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीच्या हद्दीतून जात असते त्यामुळे अशावेळी रस्ता दुतर्फा वृक्षलागवडीचे काम कोणत्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये दर्शवुन त्याबाबतचे NREGA Software वर Work Code तयार होण्यासाठी तांत्रिक अडचणी उद्भवतात. |

| | | |
|---|---|---|
| ११ | मजूरांची उपस्थिती NMMS या प्रणालीद्वारे Online नोंदविणेबाबत. | मनरेगा अंतर्गत सार्वजनिक स्वरुपाच्या कामांवरील मजूरांची उपस्थिती दि. ०१.०१.२०२३ पासून NMMS App या प्रणालीद्वारे Online नोंदविणे बंधनकारक केलेले आहे. त्यानुसार दररोज सकाळी ७ ते ११.३० वाजेपर्यंत सकाळची हजेरी नोंदवावी त्यानंतर सकाळची हजेरी घेतलेल्या कालावधीच्या ४ तासानंतर दुपारची हजेरी नोंदवावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत यासंदर्भात..<br>या वृत्तातील विभागाअंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्षलागवड / गट लागवड कामांच्या ठिकाणी संबंधित ग्रामरोजगार सेवक दिवसातून २ वेळा कामाच्या ठिकाणी येऊन NMMS App वर मजूरांची हजेरी नोंदविण्यास यथोचित सहकार्य करीता नाहीत.<br>तसेच बरेचदा सदरील NMMS App द्वारे तांत्रिक कारणास्तव हजेरी नोंदविल्या जात नाहीत अशा वेळी मजूरांच्या मजूरीचा प्रश्न उद्भवत आहे. |
| १२ | कार्यालयीन कर्मचारी व तांत्रिक मनुष्य बळ पुरविणे | सद्यस्थितीत क्षेत्रीय स्तरावर कार्यालयीन कामे करण्यासाठी लिपिक /लेखापाल उपलब्ध नाहीत. याशिवाय मनरेगा अंतर्गत निर्धारीत मनुष्यदिन निर्मितीची अट असल्याने त्या प्रमाणात डाटा एन्ट्री ऑपरेटर्स उपलब्ध नाहीत. क्षेत्रीय स्तरावर तांत्रिक मनुष्य बळ अपुरे आहे. त्यामुळे विहीत कालावधीत मनरेगा अंतर्गत कार्यपद्धती नुसार कामे Online नोंदविणे अडचणीचे आहे. |

२. वरील प्रमाणे नमुद मुद्दयांबाबत विभागीय वन अधिकारी (साव) छ. संभाजीनगर/हिंगोली/जालना /नांदेड व परभणी/ लातूर व धाराशिव यांनी अभिसरण योजनेअंतर्गत येणा-या अडचणींबाबतचे सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर केलेले आहेत. सदरचे अहवाल यासोबत अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहेत.

३. करीता, उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता क्षेत्रीय स्तरावर सर्व रोपवाटीका, रस्ता दुतर्फा वृक्षलागवड तसेच गट लागवड इत्यादी कामे अभिसरण योजनेअंतर्गत सरसकट अनिवार्य न करता स्थानिक परिस्थितीला अनुसरुन मनरेगा अभिसरण अंतर्गत उक्त कामे घेणे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर विविध भागात रोपे लागवडीची कामे विशेषतः पूर्व- पावसाळी कामे व प्रथम वर्षीय कामे या २ प्रमुख टप्प्यांकरीता राबविण्यात यावीत व तद्नंतर अभ्यास समिती गठीत करून संपूर्ण अभ्यासाअंती कामाचे बाबनिहाय मूल्यमापन करून अभिसरण योजना राबविणेबाबत यथोचित निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

सहपत्र :- वरील प्रमाणे

**(प्रमोद चंद लाकरा)**
**वन संरक्षक,**
**सामाजिक वनीकरण छत्रपती संभाजीनगर**

प्रतिलिपी:- विभागीय वन अधिकारी (साव) सर्व यांना माहितीस्तव रवाना.

वृक्षवल्ली आम्हासोयरे वनचरे

**विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**


वनवसाहत, नवीन प्रशासकीय इमारत, 1 ला माळा, चुन्नीलाल पेट्रोल पंपच्या मागे, न्यु उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर -431 005

ई-मेल - ddsfdabad@gmail.com

दूरध्वनी क्र. 0240-2954810


दि. 27/01/2025.

जा.क्र.अ/सावंवि/योजना/ 708 /2024-25 छत्रपती संभाजीनगर

**प्रति,**

मा.वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त,

छत्रपती संभाजीनगर.

**विषय :** अभिसरण योजने अंतर्गत काम करताना येणाऱ्या अडचणींबाबत तसेच त्याअनुषंगाने करावयाच्या उपाययोजना / मागणी बाबत.

**संदर्भ :** आपलेकडील दि.२४/०१/२०२५ व २७/०१/२०२५ रोजीच्या भ्रमणध्वनीवरील प्राप्त सूचनांनुसार.

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भास अनुसरुन सादर असे की, अभिसरण योजनेअंतर्गत कामे करताना क्षेत्रिय स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी तसेच त्यास अनुसरुन करावयाच्या आवश्यक उपाययोजना / मागणी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बाब | अडचणी | मागणी / उपाययोजना |
|---|---|---|---|
| १ | मजुरांची उपलब्धता | औद्योगिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, शहरीकरण व नागरीकरण झालेले क्षेत्र, महानगरपालिका शहरालगतचे क्षेत्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामूळे अशा क्षेत्रालगत असणाऱ्या प्रस्तावित रोपवाटीका व रस्ता दुतर्फा वृक्षलागवड तसेच गटलागवड या कामांसाठीं देखील स्थानिक मजूर सहजरीत्या उपलब्ध होऊ शकत नाहीत. | १. औद्योगिक क्षेत्र<br>२.बागायती क्षेत्र<br>३. शहरीकरण व नागरीकरण झालेले क्षेत्र<br>४. महानगरपालिका शहरालगतचे क्षेत्र<br>याठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे मजूर उपलब्ध होत नाहीत त्यामूळे अशा ठिकाणी रोपवाटीका, रस्ता दुतर्फा वृक्षलागवड तसेच गटलागवड या कामांसाठी वेगळयाने तरतुद लागू करण्यात यावी. |
| २ | हजेरीपत्रकातील मजूर कामावर न आल्यास | मग्रारोहयो अंतर्गत काम करण्यास इच्छुक असणाऱ्या स्थानिक मजुरांची कामाची पूर्व मागणी नमुना क्र. 04 मधे नमूद करून 07 दिवसांचे हजेरीपत्रक निर्गमित करावे लागते. त्यानंतर मजूर प्रत्यक्ष कामावर न आल्यास ऐनवेळी अन्य मजूर उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होवुन त्याचा वनीकरण कामावर दुष्परिणाम होतो. | मनरेगा अंतर्गत रोजगाराची मागणी ही ऐच्छिक असते. त्यामूळे नमूना ४ मध्ये रोजगाराची मागणी नोंदवून देखिल मजूर कामावर न आल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती विषद करण्यात यावी. |
| ३ | अकुशल (मजुरी) निधीची उपलब्धता. | मनरेगा अंतर्गत केंद्र शासनाने प्रत्येक जॉबकार्ड धारकास १०० दिवस रोजगाराची हमी दिली आहे. त्यानुसार १०० दिवसांची मजुरीची अदायगी ही केंद्र शासनाच्या मार्फत दिली जाते. त्यानंतर मजुरीचे प्रदान हे राज्य शासनामार्फत केले जाते.<br>परंतु बरेचदा राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मजुरीस विलंब होत असल्यामुळे मजूर मनरेगाच्या कामावर येण्यास फारसे इच्छूक नसतात.<br>हजेरीपत्रकाचा कालावधी संपल्यावर पुढील आठ दिवसांत मजूरांची मजूरी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होणे बंधनकारक आहे. मात्र सदरची मजूरी रक्कम विलंबाने प्राप्त होत असल्याने मजूर कामावर येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. | मनरेगा अभिसरण अंतर्गत १०० दिवसानंतर प्राप्त होणारी मजूरी विहीत कालावधीत उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| ४ | वृक्षलागवड व अभिसरण अंतर्गत इतर अनुज्ञेय कामे यातील फरक | सद्यस्थितीत मनरेगा अंतर्गत एकूण २६३ कामे अनुज्ञेय आहेत. त्यातील २८ कामे ही अभिसरण पद्धतीने केली जातात. उदा. शालेय स्वयंपाक गृह निवारा, नाला मोरी बांधकाम, गोदाम, सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक रस्ता, डांबर रस्ता, शाळेकरिता/ मेदानाकरिता साखळी कुंपण, अंगणवाडी काम, ग्रामपंचायत भवन, नॅडेप कंपोस्ट ई.<br>सदरील कामांचे स्वरुप हे छोट्या बांधकामाचे आहे.<br>कामाचे स्थळ हे प्रामुख्याने गावातीलच असते.<br>कोणतेही काम हे ऋतुमानावर अवलंबून नाही.<br>कामाचा कालावधी हा साधारणत: १ महिन्याचा असतो.<br><br>याउलट रस्ता दुतर्फा वृक्षलागवड व गट लागवड कामे ही<br>* नियमित स्वरूपाची असून त्याचा कालावधी हा ३ वर्षाचा असतो.<br>* ऋतुमानावर अवलंबून असतात.<br>* रोपवनाच्या वेळापत्रकानुसार तो विहित कालावधीतच पूर्ण करावी लागतात<br>* सदरील कामात मजूर अनुपल्बधतेमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव खंड पडल्यास वृक्षलागवड कामे अयशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | सद्यस्थितीत मनरेगा अंतर्गत विविध विभागांची छोट्या स्वरुपाच्या बांधकामाची एकूण २८ कामे ही अभिसरण पद्धतीने राबविली जातात.<br>त्यानुषंगाने या विभागातील कामाचे स्वरुप लक्षात घेता तुलनात्मकदृष्ट्या रोपवाटीका, रस्ता दुतर्फा वृक्षलागवड, गट लागवड इत्यादी कामे स्थानिक परिस्थितीचा सारासार विचार करुन सरसकट अभिसरणांतर्गत घेण्याकरीता अनिवार्य न करता स्थानिक परिस्थितीचा सारासार विचार करुन जिथे शक्य आहे. अशा ठिकाणी राबविण्याबाबतचे धोरण सुनिश्चित करण्याबाबत पुनर्विचार करण्यात यावा. |

AnyScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | कुशल खर्चाबाबत | वनीकरण आणि मृद व जलसंधारणाची कामे यशस्वी करण्याकरीता अकुशल निधी सोबतच रोपवाटिका खर्च, रोपे वाहतूक, सिंचित रोपवन नमुन्यानुसार व टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, काटेरी कुंपण, ट्री गार्ड खरेदी, निंदणीच्यावेळी खत देणे, सर्वे/सीमांकन/आखणी या बाबीवरील साहित्य खर्च, मजूर कल्याण व आकस्मिक खर्च ई. कुशल बाबींचा निधीदेखील वेळेवर प्राप्त होणे तेवढेच आवश्यक असते.<br>सद्यस्थितीत मनरेगातंर्गत यापूर्वी करण्यात आलेल्या रोपवाटीका व रोपवन कामांबाबतचा कुशल भागाचा निधी मोठ्या प्रमाणावर निधी अद्यापही या विभागास प्राप्त झालेला नाही व या संदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.<br>दि.२८ जुलै, २०२३ च्या अभिसरणाच्या शासन निर्णयानुसार वनीकरणाच्या कामांपैकी रोपवाटीकांची कुशल कामे ही केवळ योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदींमधुन पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे.<br>वेळीच कुशल निधी प्राप्त न झाल्यास कामांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. | एकंदरीतच यापूर्वी कुशल निधी प्राप्त होणेबाबतची पार्श्वभूमी लक्षात घेता अभिसरण योजनेंतर्गत वनीकरण आणि मृद व जलसंधारण कामे यशस्वी होण्याच्या दृष्टीकोनातून सदरील कामांच्या संपूर्ण कुशल बाबीवरील निधीची तरतूद ही योजनेतंर्गत करुन ती आगाऊ स्वरूपात प्रदान करण्यात यावी. |
| ६ | अभिसरण व योजनेतंर्गत मजुरीची अदायगीबाबत. | अभिसरण योजनेतंर्गत मनरेगा व योजनेची मजुरी एकाचवेळी वितरीत करणे अत्यावश्यक आहे.<br>मनरेगातंर्गत १०० दिवसावरील निधी बरेचदा विलंबाने प्राप्त होत असल्यामूळे मनरेगा व योजनेतंर्गत एकाच वेळी समन्वय साधून मजुरी अदा करण्यास विलंब होईल.<br>शिवाय अभिसरणातंर्गत मनरेगा अथवा योजना यापैको कोणतीही एकाची मजुरी अदा केल्यास मजुरांच्या मनात संभ्रम निर्माण होवुन त्यातुन क्षेत्रीय अधिकारी व मजूर यांच्यात वाद-विवाद उत्पन्न होवुन परिणामी वनविभागाविषयीची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | मनरेगा व योजनांतर्गत योजनेची मजुरी एकाच वेळी प्रदान करण्याच्या अनुषंगाने योजनेचे अनुशन विहित कालवधीत आगाऊ स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| ७ | नमूना अंदाजपत्रकाची निवड | १. अभिसरण योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये मनरेगा अंतर्गत घेण्याचा अकुशल (Part-A) व कुशल (Part-B) त्याप्रमाणे वनविभागाच्या योजनेमधून घेण्याचा कुशल भागाचा (Part-C) याप्रमाणे अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे.<br>२. यासंदर्भात दिनांक २८ जुलै २०२३ रोजी निर्गमित शासन निर्णयात प्रचलित नमूना अंदाजपत्रकाची निवड करुन अभिसरणांतर्गत विविध कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि त्यानुसार कोणतीही नमूना अंदाजपत्रके सहपत्रीत करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रके तयार करुन जिल्हास्तरीय छाननी समितीकडे मान्यतेस्तव सादर केल्यावर ऐनवेळी तांत्रिक प्रश्न-कुशल-अकुशल मनरेगा अंतर्गत तसेच वनविभागाच्या योजनांतर्गत तरतुदींमधुन घेण्याच्या कुशल व अकुशल भाग याबाबत स्पष्टता होत नसल्याची कारणे दर्शविण्यात येऊन कालापव्यय होतो. ही वस्तुस्थिती आहे. | अभिसरणातंर्गत करण्यात येणाऱ्या कामाच्या अंदाजपत्रकातील कुशल व अकुशल भागाबाबत एकवाक्यता / एकसमानता असण्यासाठी वनीकरण व मृद व जलसंधारण कामांची नमूना अंदाजपत्रके निर्गमित करण्यात यावीत. |
| ८ | अभिसरण समितीच्या मान्यतेबाबत | दिनांक २८ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार विभागाची जवळपास सर्वच कामे ही मनरेगा अभिसरणच्या कक्षेत आली आहे त्यामूळे शा.नि.क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/ मग्रारो-१ दि.०५ नोव्हेंबर २०१८ व शा.नि.क्र. मग्रारो-२०२१/ प्र.क्र.२६ रोहयो-१०अ दि.३०/०३/२०२१ नुसार विभागा-मार्फत प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांच्या आराखड्यास जिल्हास्तरीय अभिसरण समितीची मान्यता असणे आवश्यक आहे. परंतू उक्त नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन जिल्हास्तरीय अभिसरण समितीच्या स्वतंत्र मान्यता देण्याच्या कार्यपध्दतीचा अवलंब न झाल्यास त्याबाबत नेमक्या अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत स्पष्टता नाही. | यासंदर्भात निर्गमित शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय अभिसरण समितीची मान्यता प्राप्त होणेबाबत सुस्पष्ट निर्देश निर्गमित होणे आवश्यक आहे. |
| ९ | अंदाजपत्रकामध्ये विविध कारणास्तव जसे की, सुधारीत प्र.मा., कुशल अकुशल भागातील बदल इत्यादी कारणास्तव सुधारणा झाल्यास DPR Unfreeze करणेबाबत. | दिनांक २८ जुलै २०२३ रोजी निर्गमित शासन निर्णयात प्रचलित नमूना अंदाजपत्रकाची निवड करुन अभिसरणांतर्गत विविध कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि त्यानुसार कोणतीही नमूना अंदाजपत्रके सहपत्रीत करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रके तयार करुन जिल्हास्तरीय छाननी समितीकडे मान्यतेस्तव सादर केल्यावर ऐनवेळी तांत्रिक प्रश्न-कुशल-अकुशल मनरेगा अंतर्गत तसेच वनविभागाच्या योजनांतर्गत तरतुदींमधुन घेण्याच्या कुशल व अकुशल भाग याबाबत स्पष्टता होत नसल्याची कारणे दर्शविण्यात येऊन कालापव्यय होतो. ही वस्तुस्थिती आहे. यासोबतच अंदाजपत्रकामध्ये विविध कारणास्तव जसे की, सुधारीत प्र.मा., कुशल - अकुशल भागातील बदल इत्यादी कारणास्तव सुधारणा झाल्यास शासन परिपत्रक / म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. / परिपत्रक दिनांक १४/०४/२०१४ अन्वये राज्यस्तरावर State DBA Login मधून सदर कामांच्या वर्क कोडचे DPR Unfreeze करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हास्तरावरुन कार्यवाही करता येत नसल्यामुळे नरेगा आयुक्त, नागपूर यांचेस्तरावरुन Online कार्यवाही पुर्ण झाल्याशिवाय पुढील कामे विहीत मुदतीत करता येत नाहीत. | अभिसरणातंर्गत करण्यात येणाऱ्या कामाच्या अंदाजपत्रकातील कुशल व अकुशल भागाबाबत एकवाक्यता / एकसमानता असण्यासाठी वनीकरण व मृद व जलसंधारण कामांची नमूना अंदाजपत्रके निर्गमित करण्यात यावीत. |
| १० | रस्तादुतर्फा वृक्ष लागवडीबाबत. | रस्ता दुतर्फा रोपवनाच्या बाबत, रस्त्याचे क्षेत्र हे बरेचदा एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीच्या हद्दीतून जात असते त्यामुळे अशावेळी रस्ता दुतर्फा वृक्षलागवडीचे काम कोणत्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये दर्शवुन त्याबाबतचे NREGA Software वर Work Code तयार होण्यासाठी तांत्रिक अडचणी उद्भवतात. | एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीच्या हद्दीतून जात असलेल्या रस्ता दुतर्फा वृक्षलागवड कामाबाबत अभिसरण योजने अंतर्गत मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात. |

AnyScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मजूरांची उपस्थिती NMMS या प्रणालीद्वारे Online नोंदविणेबाबत. | मनरेगा अंतर्गत सार्वजनिक स्वरुपाच्या कामांवरील मजूरांची उपस्थिती दि. ०१.०१.२०२३ पासून NMMS App या प्रणालीद्वारे Online नोंदविणे बंधनकारक केलेले आहे. त्यानुसार दररोज सकाळी ७ ते ११.३० वाजेपर्यंत सकाळची हजेरी नोंदवावी त्यानंतर सकाळची हजेरी घेतलेल्या कालावधीच्या ४ तासानंतर दुपारची हजेरी नोंदवावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत यासंदर्भात.. या विभागाअंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्षलागवड / गट लागवड कामांच्या ठिकाणी संबंधित ग्रामरोजगार सेवक दिवसातून २ वेळा कामाच्या ठिकाणी येऊन NMMS App वर मजूरांची हजेरी नोंदविण्यास यथोचित सहकार्य करणेबाबत साशंकता आहे. तसेच बरेचदा सदरील NMMS App द्वारे तांत्रिक कारणास्तव हजेरी नोंदविल्या जात नाहीत अशा वेळी मजूरांच्या मजूरीचा प्रश्न उद्भवत आहे. | NMMS App द्वारे तांत्रिक कारणास्तव हजेरी नोंदविली न गेल्यास अशावेळी मजूरांची मजूरी प्रदान करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात याव्यात. |

करीता, उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता या विभागाअंतर्गत सर्व रोपवाटीका, रस्ता दुतर्फा वृक्षलागवड तसेच गट लागवड इत्यादी कामे अभिसरण योजनेअंतर्गत सरसकट अनिवार्य न करता स्थानिक परिस्थितीला अनुसरुन मनरेगा अभिसरण अंतर्गत उक्त कामे घेणे यासाठी प्रायोजिक तत्त्वावर विविध भागात रोपे लागवडीची कामे विशेषतः पूर्व- पावसाळी कामे व प्रथम वर्षीय कामे या २ प्रमुख टप्प्यांकरीता राबविण्यात यावीत व तद्नंतर अभ्यास समिती गठीत करून संपूर्ण अभ्यासाअंती कामाचे बाबनिहाय मूल्यमापन करून अभिसरण योजना राबविणेबाबत यथोचित निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

(किर्ती किशोर जमदाडे-कोकाटे),
**विभागीय वन अधिकारी,**
**सामाजिक वनीकरण विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर.**

AnyScanner

महाराष्ट्र शासन
विभागीय वनअधिकारी ,सामाजिक वनीकरण विभाग ,हिंगोली यांचे कार्यालय,
आझम कॉलनी ,कोथळज रोड, राष्ट्रवादी भवन शेजारी, हिंगोली.
Email- ddsfdhnl@gmail.com

जा.क्र.अ/साववि/योजना/अभिसरण/ 789 /2024-25 हिंगोली दिनांक : 27/01/2025

**प्रति,**
मा. वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण
छत्रपती संभाजीनगर.

**विषय :-** अभिसरण अंतर्गत येणाऱ्या अडचणी बाबत.

विषयांकित प्रकरणी अभिसरण योजने अंतर्गतचे कामांबाबत प्राप्त सुचनांचे अनुषंगाने अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणी खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

1) प्रत्येकच कामासाठी ग्रामपंचायतच्या सरपंचापासून ते ग्रामरोजगार सेवका पर्यंत तसेच तहसील एपीओपर्यंत सर्वांनाच वारंवार छोट्या कामांसाठी विनवण्या कराव्या लागतात. सदर विनवणीच्या अनुषंगाने संबंधितांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या अपेक्षा असतात ग्रामरोजगार सेवक यांना हजेरी घेण्यासाठी येण्यासाठी देखील अगोदर पेट्रोलभरण्यासाठी काही रक्कम दयावी लागते त्यानंतर तो जाय मोक्यावर हजेरी घेण्यासाठी येतो कधी कधी रक्कम देऊन सुद्धा येण्यास टाळाटाळ करतो कारण संबंधित व्यक्तींना वैयक्तिक कामांमध्ये जास्त रस आहे.
2) बऱ्याच ठिकाणी रोपवन कालावधीमध्ये मजूर मिळत नसल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी स्वतःच्या स्तरावर रोपे लागवड करून घेतले परंतु आजमितीस सदर ठिकाणी कोणताही सरपंच, ग्रामरोजगार सेवक मस्टर काढण्यास मदत करत नाही. त्यामुळे लागवडीवरील झालेला खर्च खड्ड्यांचा झालेला खर्च, हा वनपरिक्षेत्र अधिकारी यांना खिशातून करावा लागलेला आहे व पुढील संगोपन करण्यासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे त्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना आर्थिक व मानसिक सामाजिक दोन्ही स्तरावर अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.
3) मराठवाड्यामध्ये अभिसरण अद्याप पूर्णपणे सुरू झाले नाही, तरीदेखील तक्रारदार यांनी तक्रारी सुरू केलेल्या आहेत, की वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी मयत व्यक्तीच्या नावावर, लहान मुलांच्या नावावर, वृद्ध व्यक्तींच्या नावावर पैसे टाकून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. त्यामुळे क्षेत्रीय कर्मचारी यांचे मनोबल खचत चाललेले आहे कोणताही खर्च पडलेला नसताना कोणताही शासकीय निधी प्राप्त झालेल्या नसताना देखील तक्रारदार ही करोडो रुपयांचा घोटाळा केला म्हणून भ्रष्टाचाराच्या तक्रारी करत आहेत. अदयाप पर्यंत अभिसरणाचा खर्च पडलेला नसलेला नसलेला असताना देखील करोडो रूपांचा भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर बाबतीत तक्रारदार यांचेकडे चौकशी केली असता तक्रार मागे घेण्यासाठी त्यांच्या मोठमोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे क्षेत्रिय कर्मचारी यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.
4) ग्रामसभेचे दिलेल्या मागणीप्रमाणे मस्टर जनरेट केल्यावर मस्टर वरील अनेक मजूर हे प्रत्यक्षात कामावर येत नसल्याने मस्टर झिरो होण्याचे प्रमाण देखील अधिक आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.
5) मस्टर वरील मजुरांची हजेरी नोंदवण्याकरता वनरक्षक यांना दररोज जायमक्यावर उपस्थित राहावे लागते त्यामुळे इतर कोणत्याही महत्त्वाच्या कामांना त्यांना उपस्थित राहता येत नाही पर्यायाने कार्यालयीन कामकाज तसेच इतर क्षेत्रीय कामकाज प्रभावित होऊन कामाचा ताण क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर वाढत आहे.
6) शेतीच्या कामाच्या दिवसांमध्ये मजुरांना शेतकरी हा पाचशे रुपये पासून एक दीड ते दोन हजारापर्यंत दिवसाचे मजुरी देत असल्याकारणाने मजुरांना अभिसरणाच्या कामांवर येण्यामध्ये बिलकुल रस नाही. त्यामुळे रोपांच्या लागवडीच्या

वेळेला मजुरांचा मोठा प्रमाणावर तुटवडा जाणवला व जे थोडेफार मजूर कामावर आले होते. तेही शेतीच्या कामावर मजुरी जास्त मिळत असल्याने अर्ध्यातच काम सोडून निघून गेले. त्यामुळे रोपवन लागवड पूर्ण करणे व त्याची यशस्वीतता अबाधित राहील यासाठी प्रयत्न करणे यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना कस लावावा लागत आहे.

7) शेतीच्या कामासाठी शेतकरी स्वतः वाहतुकीच्या साधनांचा बंदोबस्त करून मजुरांना शेतीच्याकामावर घेऊन जातात काम झाल्यानंतर परत त्यांच्या घरपोच जाण्याचे व्यवस्था शेतकऱ्यांना मार्फत केली जात आहे त्यामुळे वनविभागाच्या कामावर येण्यासाठी येण्या जाण्याची व्यवस्था करण्यासाठी मजुरांकडून मागणी होत आहे, कोणत्याही प्रकारचा कुशल निधी आधी प्राप्त होत नसल्याने क्षत्रिय कर्मचारी यांना वाहतुकीची व्यवस्था करण्यासाठी वित्तीय बाबींचे तरतूद करताना अडचणी सामना करावा लागत आहे.

8) रोपवनामध्ये रोपेलागवडीच्या कालावधीमध्ये गुत्ता किंवा ठेका पद्धतीने शेतकऱ्यांमार्फत काम दिले जाते त्यामुळे मजुरांना कधीकधी दिवसाला दोन हजारापर्यंत मजुरी मिळते त्यामुळे वनविभागामार्फत देय असलेली मजुरी तेही वेळेवर मिळत नसल्यामुळे मजूर वनविभागाच्या कामाकडे दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे क्षेत्रीय कर्मचारी यांना मजुरांचे देखील मनधरणी करण्याचे वेळ आलेली आहे.

9) अभिसरणाच्या तांत्रिक कामासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याकारणाने वारंवार तहसील कार्यालयातील एपीओ यांची मनधरणी करावी लागते त्यांना वारंवार एकाच बाबीसाठी विनवणी करावी लागते. वारंवार पाठपुरावा व विनंती केल्यानंतरही एपीओ यांच्याकडून काम मार्गी लावण्यासाठी टाळाटाळ केली जाते. सर्व एपीओ यांना सार्वजनिक कामापेक्षा वैयक्तिक कामांच्या बाबींमध्ये जास्त रस असल्याचे दिसून येते त्यामुळे क्षत्रिय कर्मचारी यांना दुहेरी तानाचा सामना करावा लागत आहे. जर इतर ठिकाणावरून मस्टर काढणे, online करणे या बाबी केल्यावर ते इतर प्रकारे आडवणूक करण्यास सुरुवात करतात.

10) वेळेवर प्राप्त न होणारी मजुरी, शेती कामापेक्षा वन विभागाच्या कामावर कमी मिळणारी मजुरी, कमी मेहनतीत वैयक्तिक कामावर मिळणारा मजुरीचा दर, यामुळे मजूर हे वनविभागाच्या कामाकडे दुर्लक्ष तर करतच आहे परंतु त्यांना त्या कामांमध्ये कोणताही रस राहिलेला नाही व वेळेवर न मजुरी मिळाल्यामुळे वनविभागावर मजुरांमध्ये रोष वाढत आहे जे मजूर कामावर येतात त्यांना दर आठवड्याला बाजारासाठी advance मध्ये मजुरी द्यावी लागते. त्यांच्या बाजार हाटाची गरज भागवावि लागते परंतु अभिसरण अंतर्गत संबंधिताच्या खात्यावर पैसे जमा होत असल्याकारणाने व तेही वेळेवर मिळत नसल्याकारणाने मजूर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या विरोधात तक्रारी करत आहेत. त्यामुळे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना काम करताना अतिरिक्त तानाचा सामना करावा लागत आहे.

11) पर्यायाने कामे अर्धवट राहून कामाचा दर्जादेखील अबाधित राखता येत नाही त्यामुळे रोपवण्याच्या यशस्वीततेवर परिणाम होऊन रोखून रोपवन अयशस्वी होण्याची शक्यता जास्त वाढली आहे.

12) रोपवन कामांचा कुशल निधी वेळेवर उपलब्ध होत नाही, कुशल निधी वेळेवर न मिळाल्याने ऑनलाइन प्रणालीवर वनविभागाचे कामे प्रलंबित दिसत आहेत त्यामुळे वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस बजावल्या जातात व कुशल निधी अभावी सदर कामांच्या सीसी अपलोड करण्यास अडचणी निर्माण होतात, परंतु दोन्ही स्तरावर क्षेत्रीय अधिकारी यांना वरिष्ठ कार्यालय मार्फत तसेच महसूल कार्यालयामार्फत येणाऱ्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने उत्तरे द्यावे लागतात त्यामुळे क्षत्रिय कर्मचारी यांना दोन दोन कार्यालयांच्या स्तरावर एकाच वेळी अहवाल सादर करणे ची वेळ आलेली आहे परंतु क्षेत्रीय कर्मचारी यांच्याकडे कोणतेही मनुष्यबळ मदतीस म्हणून उपलब्ध नसल्याकारणाने विविध कामांची एकाच वेळेत सर्वच बाबी क्षेत्रीय व कार्यालयस्तरावर पूर्ण करणे शक्य न झाल्याने प्रलंबित अहवालांचे संख्या वाढत आहे त्यामुळे वनविभागाचे प्रतिमा मलिन होत आहे.

13) नवीन शासन निर्णय प्रमाणे मागील तेव्हा काम या अटीमुळे रोपवनाच्या कामावर वयोवृद्ध व अंगमेहनतीचे काम सक्षम नसलेल्या लोकांची कामाची मागणी वाढलेली आहे. सदर मजुरानमुळे रोपवनाची अंगमेहनतीची कामे पूर्ण करून घेता येत नाही. परिणामी रोपवन कामे अर्धवट राहतात. त्यामुळे रोपनाच्या यशस्वीतेच्या अनुषंगाने कामे पूर्ण करून घेण्यास क्षेत्रीय कर्मचारी यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

14) रोजगार सेवक मस्टर काढण्यासाठी मदत करत नाहीत, काही गावानमधे जॉब कार्ड वाले मजूर उपलब्ध नाहीत, काही गावामधे जॉब कार्ड वाले मजुर आहेत परंतु ते इतर कामासाठी त्यांचा उपयोग होतो जसे कि, पांदनरस्ते, घरकुल, विहीर ई.

15) अभिसरण आणि नरेगा अंतर्गत काम करत असताना ज्या गावांमध्ये आपण काम करतो त्या गावांमध्ये रोजगार सेवक यांना मागणीपत्र कितीही वेळा मागितली तरी सहजासहजी देण्यास तयार नसतो. कामावर गेल्यावर रोजगार सेवक मार्फत घेण्यात येणारी हजेरी नियमित घेतल्या जात नसल्यामुळे मस्टर झिरो होते आणि त्यामुळे मजूर कामावर हजर असूनही मजुरांच्या मजुरीचा विषय निर्माण होतो. हजेरी न पडल्यामुळे मजूर कामावर पुढच्या दिवशी येण्यास तयार होत नाहीत. तसेच प्रत्येक मस्टरची हजेरी भरण्यासाठी रोजगार सेवकाकडून डिझेल साठी पैसे मागण्यात येतात त्यामुळे दरवेळी हे देणेशक्य होत नाही. तर काही गावांमध्ये रोजगार सेवक हे पद ग्रामपंचायत मधील अंतर्गत वादामुळे भरल्या गेलेले नाही त्यामुळे मस्टर ची मागणी करून मस्टर काढण्यात अडचणी येत आहेत. यासाठी आपण ग्रामसेवकाच्या स्तरावरून जरी मस्टर काढले तर गावातील काही लोक याला विरोध करून कामात अडथळा आणत आहेत. तसेच अभिसरण मार्फत देण्यात येणारी रोजची मजुरी लोकांना योग्य वाटत नसल्या कारणास्तव मजूर कामावर येण्यास इच्छुक नाही.

16) मजुरांची मागणी करताना बऱ्याचशा मजुरांचे जॉब कार्ड ही गावात अद्याप वाटप झालेले नसल्याने ही अडचण येत आहे. प्रत्येक गावामध्ये इतर यंत्रणेच्या मार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. त्यावरही मजूर वापरले जात असल्याकारणाने काही गावांमध्ये मजूर उपलब्ध होत नाहीत. सर्वात मोठी अडचण म्हणजे मजुरी ही तीन ते चार महिने झाले तरी त्यांच्या खात्यावर पडत नसल्या कारणाने ते मजूर कामावर येण्यास इच्छुक नसतात. मागील वर्षीचे अभिसरण अंतर्गत काम करताना काही रोपवन स्थळांची पूर्ण लागवड होऊनही आजपर्यंत त्या ठिकाणी एकही मस्टर निघालेले नाही. अशाप्रकारे अभिसरण अंतर्गत ग्राम स्तरावर कामे करताना अडचणी येत आहेत त्यामुळे काम करणे कठीण होत आहे.

17) अभिसरण या साईटवर ग्रामरोजगार सेवक जात नाही, जिओटॅग फोटो घेत नाही, जर झालेच तर मजुरी लगेच मागतात व त्यांची मजूरी पगार वेळेवर होत नाही, तसेच मस्टर काढण्यासाठी खुप अडचणी येतात विशेष म्हणजे ग्रामरोजगार हे त्या गावातील स्थानिक असून ते कोणतेच काम करीत नाही, आणि प्रत्येक कामात अडथळा आणतात व गावचे सरपंच पण त्या ग्राम रोजगार सेवक ला सपोर्ट करतात, अश्या अनेक अडचणी क्षेत्रीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना येतात. पर्यायाने वादाची परिस्थिती निर्माण होते.

18) काही ठिकाणी तर मस्टर निघते, जॉब कार्ड वाले मजूर पण असतात, रोजगार सेवक पण काम करतो परंतु ते फक्त फोटो काढण्या पुरतेच सकाळी व सायकळी येतात त्यांना काम पूर्णकरण्याशी काही देणे घेणे नाही आशा ठिकाणी क्षेत्रीय कर्मचारी यांना दुसरे मजूर लावून काम करून घावे लागते.

19) त्यामुळे वेगळ्याने मजूर लावून केलेला कामांच्या मजुरीचा प्रश्न पुन्हा तयार होतो तसेच रोपवाराच्या यशस्वी ते बाबत पुन्हा क्षेत्रीय कर्मचारी यांच्या डोक्यावर टांगती तलवार असते. त्यामुळे मजुरीसाठी उपोषण करणे मोर्चा काढणे यासारख्या बाबीच्या धमक्या क्षेत्रीय कर्मचारी यांना मिळताना देखील निदर्शनास येत आहे.

20) ग्रामसेवक मागणी पत्र देत नाही, कारण त्याला दोन वेळेस फोटो काढावे लागत असल्यामुळे उडवा उडवी चे उत्तर देत आहे. पैसे वेळेवर मिळत नसल्यामुळे लेबर कामावर येत येण्यास इच्छुक होत नाहीत तसेच रोजगार सेवकाला पेट्रोल साठी पैसे वेगळे पाहिजे जिओ टेगीन फोटो पण काढत नसल्यामुळे सदरील मस्टर झिरो होत आहे. व मजूर वनरक्षकांकडे मजुरीसाठी तगादा लावत आहेत. तसेच चार चार महिने मजुरांची मजुरी मिळत नसल्याने मजूर कामावर येण्यास इच्छुक नाही. तसेच गावातील अंतर्गत राजकारणामुळे देखील सदर कामे प्रभावित होत आहेत.

21) बाजूच्या गावातही मजूर उपलब्ध नसणे, मग्रारोहयो अंतर्गत गावात इतर चाललेली कामे, वृक्ष संगोपन व संवर्धन या कामी वेळेवर काम न होणे, तहसील मधून ऑपरेटर वेळेवर मस्टर काढत नाहीत. मस्टर वेळेवर एम आय एस करत नाही त्यामुळे तांत्रिक अडचण तयार होऊन मजुरीअदा करण्यास विलंब होत आहे.

22) शेतीच्या कामापेक्षा कामाची मजुरी कमी असल्याकारणाने मजुराची काम करण्यासाठी प्रचंड अनावस्था आहे. परिणामी कामाची गुणवत्ता राहत नाही व आपण केलेली वृक्ष लागवड यशस्वी होत नाही, नेटवर्कचा प्रॉब्लेम व बऱ्याच वेळा ॲप्स चालत नसल्याकारणाने मस्टर झिरो होऊन जाते, रोजगार सेवकाला कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण नसल्याकारणाने आपली गरज म्हणून त्याची कामे आपल्यालाच करावी लागतात.

23) गावात लेबर मिळत नाहीत. हजेरीपत्रक निवून पण कधी फोटो ऑनलाईन होत नाहीत. रोजगार सेवक पण रोज फोटो काढावे लागतात म्हणून या कामाची टाळाटाळ करतात आणि लेबरांचे मत आहे की बाहेर मजुरी भरपूर मिळते

वनीकरणच काम करून कमी पैसे आणि वेळेवर मिळत नाहीत. आणि कधी फोटो ऑनलाईन होऊन पण लेबरच्या खात्यात पैसे पडत नाही. चार पाच महिने मजूरांची मंजूरी मिळत नाही वृक्ष संगोपन व संवर्धन वेळेवर कामे न होणे अशा अभिसरण च्यां बऱ्याच कामात अडचणी येत आहेत.

24) मग्रारोहयो योजने अंतर्गत कामाचे मजूरांचे हजेरी प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी दिवसातून दोन वेळा ऑनलाईन नोंदवावी लागते. वनविभागांतर्गत अभिसरण अंतर्गत घेण्यात आलेले रोपवन स्थळ हे दुर्गम व डोंगराळ भागात असल्याने बरेच अंतर पायी जावे लागते. त्यामुळे रोजगार सेवक दोन वेळा ऑनलाईन हजेरी नोंदविण्याकरिता जाण्यास टाळाटाळ करतात. मजूरांची दैनंदीन हजेरी अपलोड करतांना जंगल भागात नेटवर्क मिळत नाही. तसेच कामांचा संकेतांक (वर्ककोड) ज्या ठिकाणावरून जनरेट केलाआहे त्याच ठिकाणी मजूर बोलवून मोबाईल कॅमेराद्वारे छायाचित्र अँड्राईड ॲपमध्ये अपलोड करून हजेरी अपलोड करावी लागते यासाठी काम करतांना मजूर पुढील भागात गेले असतील तर ते माघरी येण्यास तयार होत नाही. दिवसभरात दोनदा हजेरी घेवून हजेरी ऑनलाईन नोदंवितांना तांत्रीक अडचण आली तर मजूरांची हजेरी नोंदविली जात नाही.

25) औद्योगिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, नागरी क्षेत्र इा' ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अभिसरण योजने अंतर्गत मजूर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी रोपवन कामे करण्यासाठी मजूर बाहेरून आणून कामे पूर्ण करावी लागतात. परंतू 5 कि. मी. पेक्षा जास्त अंतरावरील मजूर कामावर लावता येत नाही.

26) मग्रारोहयो योजनेवर काम करणारे मजूराचे शेतीचे कामे व वनविभागाची लागवड कामे एकाच वेळी सुरू होत असल्यामुळे मजूर उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होतात. परीणामी लागवड कामे विहीत वेळेत पूर्ण होत नाहीत.

27) अभिसरण योजने अंतर्गत मग्रारोहयो अंतर्गत मस्टरवरील मजुरांकडून कामे करावी लागतात. रोपवन क्षेत्र हे गावापासून जवळपास 6-7 कि. मी. अंतरावर असल्याने मजुरांना कामे करण्याकरिता 6-7 कि.मी. अंतर पायी चालत जावे लागते. त्यामुळे ग्रामपंचायत अंतर्गत सुरु असलेल्या गावानजीक असलेल्या कामांना प्राधान्य देतात. यामुळे रोपवनाचे कामावर बहुतांश वेळा मजूर गैरहजर असतात. यामुळे मस्टर जनरेट झाल्यानंतर त्यामध्ये किती मजुरांचा समावेश आहे व ज्या मजुरांचा समावेश आहे ते सर्व मजूर कामावर येतील अथवा नाही याबाबत साशंकता असल्याने कामे पूर्ण करणेबाबत संबंधित क्षेत्रीय कर्मचारी यांचेवर कायम दबाव राहतो.

28) अभिसरण योजने अंतर्गत मस्टरवरील मजुरी मग्रारोहयो अंतर्गत व उर्वरित रक्कम अभिसरण अंतर्गत वनविभागाकडून देण्यात येते. मग्रारोहयो अंतर्गत देय असलेली मजुरीची रक्कम विलंबाने प्राप्त होत. असल्याने मजुरांना वेळेत त्यांचे कामाचा मोबदला अथवा मजुरी मिळत नाही गामुळे संबंधित मजुर यांची नाराजी होवून ते वनविभागाचे कामावर येण्यास टाळाटाळ करीत असतात.

29) मग्रारोहयो अंतर्गत मस्टरवरील मजुरांकडूनच कागे कारावी लागत असल्याने स्थानिक मजुरांवर विसंबून राहावे लागतो. सदर मजूर हे बहुतांशी वेळेस गैरहजर असतात, तसेच रोपवनाचे कामावर असताना मध्येच त्यांच शेतात जावून शेतातील कामे करतात त्यामुळे कामे हि वेळेत पूर्ण होत नाही. क्षेत्रीय कर्मचारी यांना मजुरांचा पाठपुरावा करून व त्यांना विनती करून कामावर बोलवावे लागते. यामध्ये क्षेत्रीय कर्मचारी यांचा बहुतांशी वेळ खर्ची होतो.

30) शेतकरी हे शेत मजुरांना रोखीने मजुरी अदा करतात तसेच त्यांना शेतकऱ्यांमार्फत अग्रीमही दिला जातो परंतु अभिसरण योजने अंतर्गत वेळेवर मजुरी दिली जात नाही. तसेच वनविभागातील वृक्ष लागवडीचे क्षेत्र हे 10 हे. पेक्षा कमी असते त्यामुळे तेथे एकच संरक्षण मजुर असल्यामुळे ग्रामरोजगार सेवक हजेरी घेण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे संरक्षण मजुराची मजुरी मिळण्यास अडचण निर्माण होते.

31) 2024 च्या पावसाळ्याच्या मजुरांना मग्रारोहयो अंतर्गत चावयाची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मंजूर कामावर आले नाहीत त्यामुळे सप्टेंबर महिन्यापर्यंत रोप लागवडीची कामे चालू होते. तसेच त्यामुळे निंदणी कामांवरही परिणाम होऊन निंदणी कामे उशिरा झाली त्याचा परिणाम रोपवन यशस्वीतेवर होतो.

32) मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होतो, मजुर कमी कामे करुन पूर्ण नगदी मजुरीची अपेक्षा करतो. उदा. लागवड कामी एक मनुष्य १०० वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतु प्रत्यक्ष कमी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पुर्ण होत नाही.

33) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गत ची मजुरी एकाच वेळेस मिळणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी न मिळाल्यास मजुरी अर्धवट मिळाली, कमी मिळाली म्हणून ओरड करतात, तक्रारी करतात.

34) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर सर्व स्रोत बंद झाल्यावर नाईलाज म्हणून अभिसरणाचे कामावर येतात तसेच मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती अंतर्गत त्यांच्या गावात व शेतात सिंचन विहिरी शेततळे रस्ते बांधकाम यासारखे कामे उपलब्ध होतात. त्यामुळे जंगल परिसरात दुरवर पायपीट करीत अभिसरण च्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

35) जेवढे मजुरांचे मस्टर जनरेट झाले आहे, तेवढे मजुरांनी मस्टरच्या कालावधीनुसार कामावर येणे अपेक्षित असतांना तेवढे मजुर कामावर येत नाही. निम्यापेक्षा कमी मजुर कामावर उपस्थित राहतात. तसेच पुढील नवीन मस्टर जनरेट करेपर्यंत आठवडाभर जेवढे मजुर कामावर येतील, तेवढ्याच मजुरांकडून कामे करून घ्यावी लागतात.

36) कामावर आलेले मजुर हे सुध्दा अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार कामे करीत नाही. मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की, मजुर काम करतांना वेळकाढू पणा करतो. उदा. खडडे खोद काम करतांना एक मजुराला एका मनुष्य दिवसामध्ये 10 ते 12 खडडे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार खोदत नाहीत. परंतू मजुरी मात्र त्या एका मनुष्य दिवसाची पुर्ण घेण्यांची मागणी करतो. परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे, तेवढे काम पूर्ण होत नसल्याने, रोपवन अंदाजपत्रकानुसार कामे विहित वेळेत होत नाहीत.

37) एखाद्या गावात अभिसरण योजने अंतर्गत काम मंजूर असते मात्र त्या गावातील मजूर कामावर येत नाही. जे मजूर कामावर यायला तयार असतात ते पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील असतात पण त्यांना कामावर लावता येत नाही. त्यामुळे कामे अपूर्ण राहतात.

या विभागानंतर्गत सर्व परिक्षेत्रात शासन परिपत्र क्रमांक साववि-२०२४/प्र.क्र.10 (भाग-१)/फ-११ दि. 04 मार्च २०२४ अन्वये पुर्व पावसाळी कामापैकी खड्डे खोदण्याचे काम योजनेतून करण्यात आले. तदनंतरची सर्व कामे अभिसरण अंतर्गत करणे अपेक्षीत असल्याने वेळोवेळी मागणी नोंदवून मजूर उपलब्ध होवू शकले नाहीत. मात्र लागवडीचे काम वेळेत करणे अपेक्षीत असल्याने सदरचे काम श्रमदानातून पुर्ण करण्यात आले आहे.

वरील सर्व अडचणींमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावित कामांची संख्या कमी प्रमाणात आहे. तरी सदर अडचणीचे निराकरण करणेस विनंती आहे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

(श्रीमती.पी.पी.पवार)
**विभागीय वन अधिकारी**
**सामाजिक वनीकरण विभाग हिंगोली**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण जालना यांचे कार्यालय

प्लॉट क्रमांक 10, पांगरकर नगर, अंबड रोड जालना 431 213

दुरध्वनी क्रमांक – 02482 – 223946 ईमेल – ddsfdjalna@gmail.com

जा.क्र.अ/सावविजा/योजना / 385 /2024-25 दि.27/01/2025.

प्रति,
मा. वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण,
छत्रपती संभाजीनगर

विषय :- अभिसरण योजनेंतर्गत कामे करताना येणाऱ्या अडचणींबाबत.

संदर्भ:- 1) मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा. नागपुर यांचे अध्यक्षतेखालील दिनांक 20.01.2025 रोजीच्या व्ही.सी. मधील सुचना.
2) वनपरिक्षेत्र अधिकारी सा.व.प. मंठा, भोकरदन व जाफ्राबाद यांचेकडील दिनांक 16/01/2025 रोजीचे निवेदन

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दिनांक 21/01/2025 रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनवल प्रमुख) म.रा. नागपूर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या V.C. द्वारे झालेल्या चर्चेनुसार अभिसरण अंतर्गत कामे करतांना येणा-या अडचणींबाबत अहवाल सादर करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत.

त्याअनुषंगाने अभिसरण योजनेंतर्गत कामे करताना येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

अ मजुरी व कुशल निधी वितरण

1.00 अभिसरण योजने अंतर्गत रोपवन कामे करतांना राज्य योजने अंतर्गत देय मजूरीची रक्कम संबंधित मजूर यांना विभागांतर्गत वितरीत करण्यात आलेली आहे. परंतू कामे पूर्ण होऊन बराच कालावधी झाल्यानंतर सुध्दा मग्रारोहयो अंतर्गत मजूरीची रक्कम संबंधित मजूर यांना मिळालेली नाही व मग्रारोहयो मधून प्राप्त होणा-या मजूरीचे निधीवर वनविभागाचे प्रत्यक्ष नियंत्रण नाही, त्यामुळे मजूरांचा वनविभागावर रोष निर्माण झालेला असून मजूर कामावर येण्यास तयार नाहीत. त्यामुळे वनक्षेत्रात इतर कामे करतांना, लोकसहभाग मिळविणे अडचणीचे होत आहे.

ब मग्रारोहयो अंतर्गत कामाची प्रक्रिया

मग्रारोहयो योजने अंतर्गत कामाचे मजूरांचे हजेरी प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी दिवसातून दोन वेळा ऑनलाईन नोंदवावी लागते. वनविभागांतर्गत अभिसरण अंतर्गत घेण्यात आलेले रोपवन स्थळ हे दुर्गम व डोंगराळ भागात असल्याने बरेच अंतर पायी जावे लागते. त्यामुळे रोजगार सेवक दोन वेळा ऑनलाईन हजेरी नोंदविण्याकरिता जाण्यास टाळाटाळ करतात. मजूरांची दैनंदीन हजेरी अपलोड करतांना जंगल भागात नेटवर्क मिळत नाही. तसेच कामांचा संकेतांक (वर्ककोड) ज्या ठिकाणावरून जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजूर बोलवून मोबाईल कॅमेराद्वारे छायाचित्र अँड्राईड ॲपमध्ये अपलोड करून हजेरी अपलोड करावी लागते यासाठी काम करतांना मजूर पुढील भागात गेले असतील तर ते

माघारी येण्यास तयार होत नाही. दिवसभरात दोनदा हजेरी घेवून हजेरी ऑनलाईन नोंदवितांना तांत्रीक अडचण आली तर मजूरांची हजेरी नोंदविली जात नाही.

तसेच संदर्भ क्र.2 अन्वये, अभिसरण अंतर्गत कामे करतांना येणा-या अडचणीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी सावप मंठा, भोकरदन व जाफ्राबाद यांचेकडील दिनांक 16/01/2025 रोजीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. सदर निवेदन या पत्रासोबत सहपत्रित करुन सादर करण्यात येत आहे.

सोबत: - वरीलप्रमाणे

(राहुल शेळके)
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण जालना

# निवेदन

प्रति,  दि. 6/01/2025

मा. विभागीय वन अधिकारी
सामाजीक वनीकरण विभाग
जालना

विषय :- अभिसरण योजनेतंर्गत वनीकरण  कामे करताना येणाऱ्या अडचणींबाबत...

संदर्भ :- महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: सावनि-2022/प्र.क्र.58/फ-11 दिनांक, 28 जुलै, 2023

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये वन विभागातील वनीकरण  कामांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत योजनांचे मनरेगा योजनेतंर्गत अभिसरण करण्यात आलेले आहे त्यानुसार सन 2024-25 मधे रोपवनाची कामे करण्यात आली होती. सदरील कामे करतांना क्षेत्रिय स्तरावर प्रत्यक्षात खूप अडचणी उद्भवत आहेत त्यानुषंगाने सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

1. <u>ग्रामसभेचा ठराव :-</u>

अभिसरण योजनेतंर्गत नवीन कामांसाठी ग्रामसभेचा ठराव वारंवार पत्रव्यवहार व विनवण्या करुन देखील सहजासहजी मिळत नाही. या योजनेतंर्गत मजूरीचा दर जास्त असल्यामुळे त्याचा गावातील इतर ग्राम विकासाच्या कामांवर विपरीत परिणाम होऊ शकतो असा स्थानिक पातळीवर गैरसमज निर्माण होत आहे. याबाबत वेळोवेळी गैरसमज दूर करुनही ग्रामपंचायत स्तरावरुन सहकार्य मिळत नाही तसेच ग्रामपंचायतींना कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून गायरान क्षेत्रावर रोपवन व रस्ता दुतर्फा वृक्षलागवडीची कामे करावयाची असल्यास अशावेळी देखील ग्रामसभेचा ठराव देण्यास टाळटाळ केली जाते.

2. छाननी समितीची मान्यता :-

शासन निर्णय क्र.नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) मग्रारो-2016/प्र.क्र.102/मग्रारो-1 दिनांक.29 सप्टेंबर 2016 नुसार मनरेगा अंतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी छाननी समितीची मान्यता बंधनकारक आहे तत्पुर्वी खाली नमुद कार्यवाही पूर्ण करावी लागते.

## <u>अभिसरणाकरीता (Top-Up Model) प्रचलित प्रमाणभूत कार्यपध्दती</u>

1) वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून पुढील वर्षी घेण्यात येणाऱ्या कामासंदर्भात संबंधीत ग्रामपंचायतीस कामांच्या यादीसह पत्र देणे.

2) ग्रामसेवकाकडून ग्रामसभेत ठराव मांडणे.

3) ग्रामसभेत मान्यता मिळाल्यानंतर सदर कामांची यादी ठरावासह गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करणे.

विभागीय वन अधिकारी (सा.व.) जालना
आ.क्र. 1448
शाखा - [illegible]
दिनांक [illegible]

4) पंचायत समिती स्तरवरील सर्व वार्षिक कृती आराखडा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांचेकडे सादर करणे.

5) जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये (G.B.) कृती आराखडा म्हणून मान्यतेकरीता सादर करणे.

6) मान्यता दिल्यानंतर संबंधीत कामांची यादी विभागीय कार्यालयामार्फत वनपरिक्षेत्र स्तरावर अंदाजपत्रके तयार करण्याकरीता पाठविणे.

7) वनपरिक्षेत्र स्तरावर सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या यादीप्रमाणे अंदाजपत्रके तयार करणे.

8) सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता घेऊन विभागीय कार्यालयामार्फत छाननी समितीकडे पाठविणे.

9) छाननी समितीने मान्यता दिल्यानंतरच मंजुर कामांना प्रशासकीय व कार्यारंभ आदेश देणे.

वरील सर्व प्रक्रिया ही वेळेवर पार पडत नाही. छाननी समितीच्या बैठका वेळेवर होत नाहीत त्यामुळे विहित कालावधीत कामे सुरू होत नाहीत. एकंदरीत वन अधिकारी व कर्मचारी यांचा बहुतांश वेळ या कामातच जातो त्यामुळे क्षेत्रिय व कार्यालयीन कामकाज विस्कळीत होत आहे.

3. रोपवनाची पूर्व पावसाळी कामे :-

रोपवनाच्या पूर्व पावसाळी कामासाठी अभिसरण अंतर्गत मजूर उपलब्ध न झाल्यामुळे शासन परिपत्रक क्र.सा.व.वि. 2024/प्र.क्र.10(भाग-1)/फ-11 दि.04 मार्च 2024 नुसार पूर्व पावसाळी कामांपैकी केवळ खड्डे व गुरेप्रतिबंधक चर खोदण्याची कामे योजनांतर्गत निधीतून करण्यात आली. त्याव्यतिरीक्त इतर अंदाजपत्रकीय बाबी मजूरा करवी करण्यासाठी खुप अडचणी आल्या.

- रोपवनाची पुर्व पावसाळी कामे ही अंगमेहनतीची असतात.
- अशा खोदकामाकरीता मुळातच मजूर इच्छूक नसतात.
- कामाचा कालावधी हा उच्च तापमानाचा असतो.
- मनरेगामधे महिला, वृध्द अशा लोकांचीच मागणी अधिक असते.
- मनरेगा योजना ही "मागेल त्याला काम" या तत्वावर चालते. या योजनेतर्गत खोदकामाकरीता शारिरीकदृष्ट्या अंगमेहनतीची कामे करण्यास सक्षम नसणाऱ्या लोकांची मागणी आल्यास ती नाकारता येत नाही.

स्थानिक पातळीवर आवश्यकतेनुरूप मजूर उपलब्ध होत नाही ही वस्तूस्थिती आहे त्यामुळे सन 2024-25 मधील प्रस्तावित रोपवनाची कामे पूर्ण करण्यात खूप अडचणी आल्या आहेत व अजून येत

आहेत.

4. लागवड कामे :-

- वृक्ष लागवड व मरअळी भरण्याची कामे सामान्यतः जुलै ते ऑगस्ट या दरम्यान केली जाते.
- सदरील कालावधी हा कृषी हंगामाचा असून तो लागवडीच्या कामास Overlap करतो.
- या कालावधीत प्रत्येक गाव/तालुका/ जिल्ह्यामधे सर्वदूर मजूरांची मोठ्या प्रमाणामध्ये मागणी असल्यामुळे मजूरांचा प्रचंड तूटवडा असतो.
- मजुरीच्या दरात देखील प्रचंड वाढ झालेली असते.
- शेत मालक मजुरांची कामाच्या स्थळापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतुकीची सोय करतात तसेच आगाऊ रक्कम देतात.
- ग्रामीण भागात दिवसभर काम केल्यावर सायंकाळी अथवा बाजाराच्या दिवशी मजूरी दिली जाते त्यामुळे मजूरांचा त्या कामाकडे अधिक कल असतो.

रोपवनाची लागवड कामे ही ऋतुमानानुसार ठरावीक कालावधीतच पूर्ण करावी लागतात परंतू वरील परिस्थितीमूळे सन 2024 च्या पावसाळ्यात लागवड कालावधीत आवश्यक प्रमाणात मजूर उपलब्ध होऊ शकले नाही प्रसंगी काही ठिकाणी अखेर श्रमदानातून लागवडीची कामे पुर्ण करुन घेण्यात आली तसेच मरअळी भरणे, निंदणी व भरभांगलन करणे ई. कामाच्या वेळी मजूरांची मागणी करुन देखील मजूर उपलब्ध झाले नाही त्यामुळे रोपवनाची वरील कामे मजूरांअभावी अपूर्ण राहिली. एकंदरीत शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर सर्व स्त्रोत बंद झाल्यावर नाईलाज म्हणुन अभिसरणाचे कामावर येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

5. विहित भौतिक मापदंडानूसार कामे न करणे :-

- वनीकरण ाची कामे ही अंगमेहनतीची असून त्याकरीता शारीरीकदृष्ट्या सशक्त असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असते.
- मनरेगातर्गत स्थानिक पातळीवर विशेषत: महिला व वृध्द लोकांची मागणी मोठ्या प्रमाणावर येत असते.
- या योजनेतर्गत मजूरांची निवड करण्याची मुभा नसते.
- मागणीनूसार रोजगार पूरविणे बंधनकारक असते.
- मनरेगा अंतर्गत कामाची मजूरी ही दिवसावर अवलंबून असते परंतू वनविभागातील कामे ही भौतीक मापदंडानुसार अंदाजपत्रकात नमूद केलेल्या मनुष्य दिवसात पूर्ण करावी लागतात.
- मनरेगा अभिसरण अंतर्गत मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होत असल्याचे दिसून आले आहे. मजुर कमी काम करुन पुर्ण मजुरीची अपेक्षा करतात मग अशावेळी मजूरीवरुन वाद-विवाद होतात व मजूर कामावर येत नाहीत.

उदा. लागवड कामी एका मनुष्यदिनात 100 रोपांची लागवड करणे क्रमप्राप्त आहे परंतु प्रत्यक्षात मात्र कमी लागवड करतात परिणामी निर्धारीत मनुष्य दिनात भौतिक मापदंडानुसार कामे पूर्ण होत नाही. अशीच परिस्थिती रोपवनाचे खड्डे/चर ईत्यादीचे खोदकाम करताना देखील उद्भवणार आहे


अंदाजपत्रकात नमूद विहित मनुष्यदिनात भौतिक मापदंडानुसार कामे पुर्ण होणार नाहीत.

6. मजुरांची उपलब्धता :-

औद्योगिक, बागायती, शहरीकरण व महानगरपालिका शहरालगतचे क्षेत्र या ठिकाणी रोजगाराची संधी, रोजगारातील सातत्य व मजूरीचा दर अधिक असल्यामुळे मजुरांचा कल तिकडे जास्त असतो त्यामुळे वनविभागातील वनीकरण कामासाठी स्थानिक मजूर उपलब्ध होत नाहीत.

उदा. छत्रपती संभाजीनगर औद्योगीक क्षेत्रामध्ये जवळपास 5 ते 6 हजार लहान-मोठे उद्योग आहेत तसेच इतर क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध आहे त्यामुळे शहरालगत असलेल्या वनक्षेत्रात वनीकरण कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत तशीच परिस्थिती बागायती व शहरीकरण झालेल्या भागात देखील दिसून येते.

छत्रपती संभाजीनगर औद्योगिक क्षेत्रातील लहान-मोठे उद्योग




7. रोपवनाचे स्थळ :

➤ गावात वैयक्तिक लाभ (नाडेप कंपोस्टिंग, गांडूळ खत खड्डा, शौचालय, शेळी व कुकुट पालन शेड, रेशिम उद्योग, विहिर पुर्नभरण, शेत बांध बंदिस्ती, फळबाग लागवड ई.) अथवा सामूहिक हिताचे काम उपलब्ध असल्यास मजुरांचा कल त्या कामाकडे अधिक असतो. गावापासून बाहेर पायपीट करीत कामावर येण्यास मजूर पसंती दर्शवित नाहीत त्यामुळे अभिसरण अंतर्गत काम उपलब्ध असतांना देखील अशा कामावर येण्यास मजूरांना स्वारस्य दिसून येत नाही.

8. हजेरीपत्रक काढल्यावर मजूर कामावर न येणे :-

मग्रारोहयो अंतर्गत काम करण्यास इच्छुक असणाऱ्या स्थानिक मजुरांची पूर्व मागणी नमुना क्र. 04 मधे नमूद करून 07 दिवसाचे हजेरीपत्रक निर्गमित करण्यात येते परंतू प्रत्यक्षात कामाच्या वेळी मजूर कामावर येत नाहीत त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हजेरीपत्रके 0 करावी लागत आहे. अशावेळी त्वरीत मजूर कामावर लावून विहीत कालावधीत कामे करणे शक्य होत नाही.

9. मजुरीचे प्रदान करण्यास होणारा विलंब :-

हजेरीपत्रकाचा कालावधी संपल्यावर पुढील 8 दिवसात मजुरांची मजूरी खात्यात जमा होणे बंधनकारक आहे परतू रोहयोतंर्गत मजूरी थकीत आहे तसेच योजनेचा निधी देखील वेळेवर प्राप्त होत

नाही त्यामुळे मजूर कामावर येत नसून वनीकरणाची प्रथम वर्षीय कामे मोठ्या प्रमाणात अपुर्ण राहत आहेत. रोपवनाची निंदणी, भरभोंगलन, काटीफास लावणे, रोपांना पाणी देणे ई. कामे

विहित कालावधीत होत नसल्यामुळे रोपवनांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे.

10. प्रलंबित कुशल निधी

- वनीकरणची कामे यशस्वी करण्याकरीता अकुशल निधी बरोबरच रोपवाटिका खर्च, रोपे वाहतूक, सिंचित रोपवन नमुन्यानुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, काटेरी कुंपण, निंदणीच्यावेळी खत देणे, मजूर कल्याण व आकस्मिक खर्च ई. कुशल बाबींचा निधीदेखील तितकाच आवश्यक असतो.
- कुशल कामाचे पुरवठादार साहित्य पुरवठा करण्यापुर्वी आगाऊ रक्कमेची (Advance Payment) मागणी करतात त्याशिवाय साहित्याचा पुरवठा करण्यास तयार होत नाहीत. वेळीच कुशल निधी प्राप्त होत नसल्यामुळे सर्वदूर रोपवन व रोपवाटिकेची कामे मोठ्या प्रमाणावर बाधित होत आहेत.
- तसेच मनरेगातंर्गत यापुर्वी करण्यात आलेल्या वनीकरण व रोपवाटिका कामांचा कुशल निधी देखील मागील 2-3 वर्षापासून प्रलंबित आहे त्यामुळे साहित्य पुरवठादार सातत्याने क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांच्या मागे तगादा लावत आहेत त्यामुळे वनाधिकारी त्रस्त झाले असून त्यांच्या मानसिक स्वास्थावर देखील विपरीत परिणाम होत आहे.

11. मनरेगा व योजनेतंर्गत मजुरीचे एकाचवेळी प्रदान न करणे :-

अभिसरणातंर्गत मनरेगा अथवा योजना यापैकी कोणतीही एकाची मजूरी अदा केल्यावर मजूरी अर्धवट मिळाली म्हणून मजूर सातत्याने ओरड करतात तसेच मजुरांच्या मनात संभ्रम निर्माण क्षेत्रीय अधिकारी व मजूर यांच्यात वाद- विवाद होऊन तक्रारी होत आहेत परिणामी वनविभागाविषयी गैरसमज निर्माण होऊन विभागाची प्रतिमा मलिन होत आहे.

12. मजूरांच्या हजेरीबाबत उद्भवणाऱ्या अडचणी :-

मनरेगाच्या सार्वजनिक कामांवरील मजूरांची उपस्थिती दि. 01.01.2023 पासून NMMS App या प्रणालीद्वारे घेणे बंधनकारक केलेले आहे त्यानुसार दररोज सकाळी 7 ते 11.30 वाजेपर्यंत सकाळची हजेरी नोंदवून सकाळची हजेरी घेतलेल्या कालावधीच्या 4 तासानंतर दुपारची हजेरी नोदवावी लागते..

- अभिसरण योजनेतंर्गत प्रचलित अँड्रॉईड ॲपद्वारे मनरेगा अंतर्गत मजूरांची दैनंदिन हजेरी अपलोड करतांना कधी कधी नेटवर्क मिळत नाही.
- कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरून जनरेट केला आहे त्याचठिकाणी मजूर बोलावून त्यांची हजेरी घेऊन मोबाईल कॅमेराद्वारे छायाचित्र ॲपमध्ये अपलोड करावे लागते. काम करतांना मजूर रोपवन क्षेत्र अथवा रस्ता दुतर्फा कामात पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत.

- वन विभागातील वनीकरण च्या कामाचे स्थळ हे साधारणतः गावापासून बाहेर दूर असल्यामुळे ग्रामरोजगार सेवक दिवसातून 2 वेळा कामाच्या ठिकाणी येऊन NMMS App वर मजूरांची हजेरी नोंदविण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. परिणामी मजूर कामावर असूनही त्यांना मजूरी देता येत नाही त्यामुळे मजूर मजूरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.
- तसेच बरेचदा NMMS App द्वारे तांत्रिक कारणास्तव हजेरी नोंदविल्या जात नाहीत अशावेळी देखील मजूरांच्या मजूरीचा प्रश्न उद्भवतो.
- रोजगार सेवकाचे मानधन हे मजूरांच्या अकुशल मजूरीवर अवलंबून असते. अभिसरण अंतर्गत कामावर अतिशय कमी मानधन मिळत असल्यामुळे रोजगार सेवकाचे सहकार्य मिळत नाही.

  उदा. सध्या 2 कीमी रस्ता दुतर्फा साठी 1 रोपवन रखवालदाराचे हजेरीपत्रक काढल्या जाते. मनरेगाचा सध्याच्या मजूरीचा दर हा रु.297/- असून त्याच्या 6% म्हणजेच रु.17.82/- ऐवढे मानधन रोजगार सेवकास देय आहे त्याकरीता रोजगार सेवकाला दिवसातून दोन वेळा वाहनाद्वारे प्रसंगी पायी चालत जाऊन कामाच्या स्थळी हजेरी नोंदवावी लागते त्याकरीता रोजगार सेवक तयार होत नाही परिणामी मजूरांच्या मजूरीचा प्रश्न उद्भवतो.

13. वनसंरक्षणावर परिणाम :-

मजुरांना मजुरी वेळेवर मिळत नसल्यामुळे मजुरवर्ग व स्थानिक लोकप्रतिनिधी वनरक्षक व वनपाल यांच्यामागे सातत्याने तगादा लावतात. गावात फिरु देत नाहीत शिवाय गावात गेलेच तर त्यांना घेराव घालून मजूरीची मागणी तसेच तक्रारी करतात त्यामुळे क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना काम करणे देखिल कष्टप्रद ठरत आहे. सातत्याने गावा-गावात जाऊन मजूरांची जुळवा-जुळव करणे, प्रलंबित मजूरी व कुशल निधी, मजूरांच्या तक्रारी, रोपवन कामे अपूर्ण राहणे ई. कारणांमुळे अभिसरण अंतर्गत कामे घेण्यास क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी वर्ग उत्सुक नाहीत तसेच अभिसरणांतर्गतची कामे करण्यातच क्षेत्रिय वनाधिकारी व्यस्त राहत असल्यामुळे संरक्षण व इतर कामाकडे देखील दुर्लक्ष होत आहे.

14. रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट साध्य होत नाही :-

मनरेगातंर्गत Active जॉबकार्ड धारक मजूरांची संख्या अतिशय कमी असून सदरील मजूर हे वैयक्तिक लाभाच्या व गावातच उपलब्ध असलेल्या कमी श्रमाच्या सार्वजनिक हिताच्या कामास प्राधान्य देतात. अभिसरणतंर्गत जास्त मजूरी असूनही अंगमेहनत व गावापासून दूरवर असलेल्या रोपवनाच्या कामावर मजूर येत नसल्याचे निदर्शनास आलेले आहेत त्यामुळे रोपवनाची कामे मोठ्या प्रमाणात अपूर्ण राहत आहेत किंवा उशिरा होत आहेत . एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता मनरेगा अभिसरण अंतर्गत स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीचा उद्देश देखील साध्य होताना दिसून येत नाही.

15. वन आच्छादन वृद्धिवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता :-

- अभिसरणतंर्गत घेण्यात आलेल्या रोपवनाचे खड्डे खोदण्यासाठी मजूर उपलब्ध झाले नाही त्यामुळे

सदरील कामे योजनांतर्गत पुर्ण करण्यात आली.

- लागवडीच्या कालावधीत देखील वेळेवर आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध झाले नाही त्यामुळे काही ठिकाणी लागवडीची कामे पुर्ण करुन घेण्यात खुप उशीर झाला .
- मजूरांअभावी रोपवनाची निंदणी, भरथांगलन, काटीफास लावणे, रोपांना पाणी देणे ई. कामे देखील पूर्ण करण्यात खुप अडचणी येत आहेत .
- रोपवन रखवालदार देखील कामावर येण्यास तयार नाहीत

वरील परिस्थितीमुळे रोपांची वाढ व जिवंत रोपांच्या टक्केवारीवर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी भविष्यात वन आच्छादनात घट होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

16. अपुरे कार्यालयीन कर्मचारी व तांत्रिक मनुष्यबळ :-

सद्यस्थितीत वनपरिक्षेत्र स्तरावर कार्यालयीन कामे करण्यासाठी लिपिक/लेखापाल नाहीत शिवाय मनरेगा अंतर्गत निर्धारीत मनुष्यदिन निर्मितीची अट असल्यामुळे डाटा एन्ट्री ऑपरेटर सुद्धा नाहीत. विभागातंर्गत देखील प्रक्रिया राबवून डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरविण्यात आलेले नाहीत. मनरेगाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सर्व कामे विहित कालावधीतच पूर्ण करणे बंधनकारक आहे परंतु कार्यालयीन स्तरावर मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाचा अभाव आहे.

## निष्कर्ष

- अभिसरणतर्गत कामांच्या मंजूरीची प्रकीया वेळेवर पार पडत नसल्यामुळे विहीत वेळेत रोपवनाची कामे सुरु होत नाहीत.
- रोपवनाची पुर्व पावसाळी कामे ही अंगमेहनतीची असल्यामुळे त्याकरीता मजूर उपलब्ध होणार नाहीत.
- कृषी हंगाम व रोपवनाचा लागवड कालावधी Overlap होत असल्यामुळे या कालावधीत स्थानिक मजूरांची मागणी व मजूरीचा दर वाढलेला असतो त्यामुळे स्थानिक पातळीवर लागवडीकरीता मजूर उपलब्ध होत नाहीत.
- मनरेगातर्गत मजूरांची हजेरी ही दिवसावर असते त्यामुळे मजूर वेळकाढूपणा करुन विहित उद्दिष्ट साध्य करत नाही त्यामुळे निर्धारीत मनुष्य दिनात भौतिक मापदंडानुसार कामे पूर्ण होताना दिसून येत नाही.
- औद्योगिक, बागायती, शहरीकरण व महानगरपालिका शहरालगतचे क्षेत्र या ठिकाणी रोजगाराची संधी, रोजगारातील सातत्य व मजूरीचा दर अधिक असल्यामुळे अशा ठिकाणालगत वनीकरण कामाकरीता मजूर उपलब्ध होत नाही त्यामुळे असे क्षेत्र कायमस्वरुपी वंचित राहू शकते.
- वन विभागातील कामाचे स्थळ हे गावापासून बाहेर दूर आल्याने गावाबाहेर, दूरवर पायपीट करीत अभिसरणाच्या कामावर येण्यास मजूरांना स्वारस्य दिसून येत नाही.
- बरेचदा हजेरीपत्रक काढल्यावर प्रत्यक्षात कामाच्या वेळी मजूर कामावर येत नसल्यामुळे कधी कधी हजेरीपत्रके 0 करावी लागत आहे.
- अभिसरणतर्गत योजना व मनरेगाची मजूरी मिळण्यास वारंवार विलंब होत असल्यामुळे मजूर कामावर येण्यास ईच्छूक नसल्याचे दिसून आले आहे.
- मनरेगा व योजनेची मजुरी एकाचवेळी वितरीत होत नसल्यामुळे संभ्रम निर्माण होऊन वनाधिकाऱ्याच्या तक्रारी होत आहेत त्यामुळे विभागाची देखील प्रतिमा मलिन होत आहे.
- अभिसरणतर्गत कुशल निधी 2 ते 3 वर्षे प्राप्त होत नाही त्यामुळे साहित्य पुरवठादार साहित्य पुरविण्यास तयार नाहीत.
- मजूरांची हजेरी नोंदविण्यासाठी नेहमीच रोजगार सेवकाचे सहकार्य मिळत नाही.
- मनरेगाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सर्व कामे विहित कालावधीतच पूर्ण करण्यासाठी कार्यालयीन स्तरावर मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाचा अभाव आहे.
- अभिसरणतर्गत जास्त मजूरी असूनही या कामास यथोचित प्रतिसाद मिळत नाही. मजूर कामावर येत नाहीत त्यामुळे रोजगार निर्मितीचा उद्देश देखील साध्य होताना दिसून येत नाही.
- क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी सातत्याने अभिसरणतर्गतची कामे करण्यात व्यस्त राहत असल्यामुळे इतर कामाकडे दुर्लक्ष होत आहे.
- अभिसरणतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे अपूर्ण राहत असल्यामुळे रोपांची वाढ व गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे परिणामी भविष्यात वन आच्छादन कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मा. महोदय, मराठवाडा हा पर्जन्यछायेचा प्रदेश असून याठिकाणी पावसाचे प्रमाण व वन आच्छादन अतिशय कमी आहे त्यामुळे राष्ट्रीय वननितीनूसार वन आच्छादनात वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून वनीकरण कामे गरजेचे आहे परंतू सन 2024-25 मधे अभिसरण योजनेतर्गत घेण्यात आलेल्या वनीकरण कामात सातत्याने येणाऱ्या अडचणीमुळे सदरील योजना पुढील कालावधीत राबविणे शक्य होणार नसल्याचे दिसून येत आहे. या योजनेमुळे भविष्यात राष्ट्रीय वननितीनूसार एकुण

भूभागाच्या 33% भाग वनाच्छादित करण्याचा उद्देश देखील साध्य होणार नाही. त्यामुळे मनरेगा अभिसरण योजनेबाबत पुनर्विचार करुन ती रद्द करण्यात यावी. अशी आपणास विनंती करण्यात येत आहे..

| अ. क्र | वनक्षेत्रपालाचे नाव | कार्यरत ठिकाण | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | स्वप्निल प. पवार | नागाबाद | [signature] |
| 2) | वर्षा प्रल्हादराव पोळ | व.प.अ.सा.व.मठ | [signature] |
| 3) | सचिन रामराव मांजरमे | वपअ सा.व अंबड | [signature] |
| 4) | संजय का. शिंदे | व.प.अ.सा.व. जालना | [signature] |
| 5) | ए. आर. पेटरकर | व.प.अ.सा.व. भोकरदन | [signature] |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

महाराष्ट्र शासन
# विभागीय वनअधिकारी सामाजिक वनीकरण विभाग नांदेड यांचे कार्यालय
गट क्रमांक 120 आसर्जन पदमजा सिटी रोड नविन कोठा रोड नांदेड 431606
दुरध्वनी क्रमांक 02462-220760 इमेल ddsfdnanded@gmail.com

जा.क्र.अ / सा.व.वि-नां/ योजना अभिसरण / 521 / सन 2024-25 दिनांक 27 / 01 / 2025.

प्रति,

मा.वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण ,
छत्रपती संभाजीनगर

विषय - अभिसरण योजने अंतर्गत कामात येणा-या अडचणीबाबत.

संदर्भ - मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांचे अध्यक्ष ते खालील दिनांक 18.12.2024 रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे आयोजित आढावा बैठक.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अभिसरण योजने अंतर्गतचे कामाबाबत व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर आढावा बैठकीतील प्राप्त सुचनाचे अनुषंगाने अभिसरण योजने अंतर्गत या विभागात 19 कामे 44 किमी वृक्षलागवड कामे प्रथम वर्ष चालू असुन कामात येणा-या अडचणी खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

**4406-0492 रस्ता दुतर्फा बाबत प्रथम वर्ष अभिसरण योजना अंतर्गत कामाची माहिती.**

| अ.क्र | परिक्षेत्र | तालुका | रोपवनाचे नांव | कि.मी | रोपसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुदखेड | मुदखेड | नागेली ते आंबेगांव, रस्ता दु | 2 | 1000 |
| 2 | मुदखेड | मुदखेड | डोंगरगांव ते निवघा, रस्ता दु | 2 | 1000 |
| 3 | बिलोली | बिलोली | शिंपाळा ते सगरोळी, रस्ता दु | 2 | 1000 |
| 4 | बिलोली | बिलोली | अर्जापुर ते कुंडलवाडी, रस्ता दु | 2 | 1000 |
| 5 | मुखेड | मुखेड | हतराळा ते कलंबर, रस्ता दु | 2 | 1000 |
| 6 | मुखेड | मुखेड | कलंबर ते बामणी, रस्ता दु | 2 | 1000 |
| 7 | हदगांव | हदगांव | पिंगळी ते डोंगरगांव, रस्ता दु | 4 | 2000 |
| 8 | हदगांव | हदगांव | शिरड ते कोहळी फाटा, रस्ता दु | 4 | 2000 |
| 9 | लोहा | लोहा | उमरा ते जोमेगांव,कालवा दु | 2 | 1000 |
| 10 | उमरी | उमरी | नागठाणा ते मनर कालवा,कालवा दु | 2 | 1000 |
| 11 | उमरी | उमरी | चिंचाळा ते नागठाणा, कालवा दु | 2 | 1000 |
| 12 | धर्माबाद | धर्माबाद | करखेली ते बोळसा, रस्ता दु | 2 | 1000 |
| 13 | नायगांव | नायगांव | मुगाव ते मुगाव पाटी, रस्ता दु | 2 | 1000 |
| 14 | नायगांव | नायगांव | सालेगांव ते कुंटुर, रस्ता दु | 2 | 1000 |
| 15 | कंधार | कंधार | ब्रम्हवाडी ते मुंडेवाडी शिव,रस्ता दु | 2 | 1000 |
| 16 | कंधार | कंधार | आंबुलगा शिव ते बोरी शिव | 2 | 1000 |
| 17 | देगलुर | देगलुर | भक्तापुर ते केलुर (तेलगांना बॉर्डर), रस्ता दु | 2 | 1000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 18 | [illegible] | [illegible] | [illegible] | | |
| 19 | किनवट | किनवट | जवारला ते आबांडी घाट | 2 | 1000 |
| | एकुण एकंदर | | | 44 | 22000 |

1) अभिसरण योजनेतर्गत नवीन कामांसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग नांदेड सर्व यांच्या कडून ग्रामसभेचा ठराव पत्रव्यव्हार करुन सुध्दा सहजासहजी दिली जात नाही. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामपंचायत यांना फार विनवण्या कराव्या लागतात.अभिसरण योजनेतर्गत वरील प्रमाणे सुरु असलेल्या कामावर जॉब कार्ड धारक उपलब्ध करणे बाबत वनपरिक्षेत्र अधिकारी मुदखेड,बिलोली, मुखेड, हदगांव, लोहा, उमरी, धर्मबाद, नायगांव, कंधार,देगलुर व किनवट यांच्या कडून ग्रामपंचायत यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला असुन सदर कामावर ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या ग्रामरोजगार सेवक यांच्या कडून जॉब कार्ड धारक मजूर उपलब्ध होत नसल्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी या कार्यालयास अवगत केले असुन रोपवन संगोपन व देखभालीचे कामे झालेली नाही.

2) औधागिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, नागरी क्षेत्र या ठिकाणी मोठया प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अशा क्षेत्रा लगत असणा-या रोपवनात अभिसरण योजने अंतर्गत जॉब कार्ड धारक मजूर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी रोपवन कामे करण्यासाठी बाहेरुन मजुर आणुन कामे पुर्ण करावी लागतील.

3) अभिसरण योजनेतर्गत प्रचलित्त अॅड्रॉइड अॅपव्दारे मग्रारोहयो अंतर्गत मजुरांची अंतर्गत मजुरांची दैनंदिनी हजेरी अपलोड करताना काही भागात नेटवर्क मिळत नाही. तसेच कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरुन जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजूर बोलवुन त्यांची हजेरी अपलोड करुन मोबाईल कॅमेराव्दारे छायाचित्र अॅड्रॉईड अॅप मध्ये अपलोड करावे लागते. त्यासाठी काम करतांना मजूर पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत. दिवस भरात दोनदा हजेरी घ्यावी लागते. हजेरी घेण्यास तांत्रिक अडचण आली तर मजुरांची हजेरी लागत नाही.

4) अभिसरण योजने अंतर्गत कामे करतांना मजुरांची कमतरता, मस्टर वरील मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी , दिवसातुन 2 वेळा ऑनलाईन सांकेतीक स्थळावर फोटो घेवून हजेरी नोंदवली जाते. परंतु ग्रामरोजगार सेवक दिवसातुन 2 वेळा येण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. मजुरांची हजेरी नोंदवली जात नाही व परिणामी मजुर कामावर असुनही त्यांना मजुरी देता येत नाही. त्यामुळे मजुर मजुरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.

5) मजुरांना त्यांनी केलेल्या कामांची संपुर्ण मजुरी 8 दिवसांत न मिळाल्यास ते कामावर येत नाही. त्यामुळे कामे , अर्धवट राहतात व विहित वेळेत कामे पुर्ण होत नाहीत.

6) वनपरिक्षेत्रांतर्गत येणा-या क्षेत्रात ब यापैकी वनपरिक्षेत्र अधिकारी मुदखेड,बिलोली, मुखेड, हदगांव, लोहा, उमरी, धर्मबाद, नायगांव, कंधार,देगलुर व किनवट यांच्या अंतर्गत येणारे तालुके हे बागायती क्षेत्र असल्याने व अर्धापुर,नांदेड व नायगांव येथे एमाआडीसी असल्याने तेथ कामकेल्यास मजुरीदर जास्त मिळत असल्यान शेती कामाकडे व एमाआडीसी कामाकडे मजुरांचा कल जास्त असतो. तसेच वनविभागातील रोपवन कामे जास्त कष्टाची असल्याने वनविभागातील कामे करण्यात मजुर उपलब्ध होत नाहीत.

7) वनविभागातील रोपवन कामे स्थळ साधारणत: गावापासुन दुर, दुर्गम अथवा डोंगराळ क्षेत्रात असतात गावापासुन दररोज पायी चालुन घरापासुन लांब अंतरापर्यंत दुर्गम भागात मजुर मानसिकरीत्या रोपवन कामावर येण्यास तयार होत नाही. मजुर घरापासुन लांबच्या कामावर येण्यास पसंती दर्शवत नाहीत, त्याचवेळी गावात व्यक्तिक लाभ अथवा सामुहिक हिताचे काम उपलब्ध असल्यास मजुरांचा कल घराजवळील कामाकडे अधिक असतो. गावातील शेतमजुर हे शेतात काम करतांना शेतमालक मजुरांना रोज संध्याकाळी रोख पगार करतात. तसेच मजुरांना त्यांच्या घरापासुन शेतापर्यंत तथा कामापर्यंत ने-आण करणेकामी वाहतुकीची सोय शेतमालक उपलब्ध करुन देतात. त्यामुळे अभिसरण योजने अंतर्गत सहजासहजी जॉब कार्ड धारक मजुर उपलब्ध होत नाही व ते येण्यास देखील इच्छा/तयारी दर्शवीत नाहीत.

8) मग्रारोहयो अंतर्गतचा कुशल निधी हा वेळेवर प्राप्त होत नाही त्यामुळे कुशल निधी उपलबध होत नसल्यामुळे कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.

9) याबाबत तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रव्यवहार व विचारणा केली तर सदरचा निधी आल्याव लगेच मजुरांच्या खात्यावर मजुरी जमा होईल असे म्हणतात मात्र मजुराची मजुरी मिळत नाही.

10) [illegible] मजुरींची अपेक्षा करतो. उदा - लागवड कामी एक मनुष्य 100 वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतू प्रत्यक्ष कामी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पुर्ण होत नाही.

11) एखाद्या गावात अभिसरण योजने अंतर्गत काम मंजुर असते मात्र त्या गावातील मजुर कामावर येत नाही. जे मजुर कामावर यायला तयार असतात ते पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील असतात पण त्यांना कामावर लावता येत नाही. त्यामुळे कामे अपुर्ण राहतात.

12) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गत ची मजुरी एकाच वेळेस मिळणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी न मिळाल्यास मजूरी अर्धवट मिळाली यामुळे ओरडा करतात, तक्रारी करतात.

13) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर स्त्रोत बंद झाल्यावर नाईलाज म्हणुन अभिसरणाचे कामावर येतात.

14) मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती तसेच कृषी विभागा कडुन गावात घरकुल योजना, स्वच्छता ग्रह, गूराचा गोठा व कृषी विभाग व सामाजिक वनीकरण विभागा कडून फळझाड लागवड तसेच वृक्ष लागवड यासारखे कामे उपलब्ध होतात. त्यामुळे रोपवन कामे दुर्गम क्षेत्रात/दुरवर असल्याने पायपीट करीत अभिसरण च्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

वरील सर्व अडचणींमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावित कामांची संख्या कमी प्रमाणात आहे. तरी सदर अडचणींचे निराकरण करणेस विनंती आहे.

संदिप बाबु चव्हाण
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी

वन भवन, कारेगाव रोड परभणी ४३१ ४०१

दुरध्वनी क्र :०२४५२-२२४५१३ ई-मेल- ddsfparbhani@mahaforest.gov.in

जा.क्र.अ/सावंवि/योजना/ 346 /सन २०२४-२५ दिनांक 27.०१.२०२५

प्रति,

मा. वनसंरक्षक

सामाजिक वनीकरण छत्रपती संभाजी नगर

विषय - अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणींबाबत.

संदर्भ - मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांचे अध्यक्ष ते खालील दिनांक १८.१२.२०२४ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे आयोजित आढावा बैठक.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अभिसरण योजने अंतर्गतचे कामांबाबत व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर आढावा बैठकीतील प्राप्त सुचनांचे अनुषंगाने अभिसरण योजने अंतर्गत या विभागात ०६ कामे २१ किमी वृक्षलागवड कामे प्रथम वर्ष चालू असुन कामांत येणा-या अडचणी खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

**4406-0492 रस्ता दुतर्फा बाबत प्रथम वर्ष अभिसरण योजना अंतर्गत कामाची माहिती.**

| अ.क्र | वृत्त | विभाग | वनक्षेत्र | गावाचे नांव | रोपवन वर्ष | क्षेत्र कि.मी. | लावलेली रोपे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | छत्रपती संभाजी नगर | परभणी | सोनपेठ | नाथरा ते मरडसगाव | 2024 | ५ | २५०० |
| 2 | | | परभणी | लोहगाव ते ठोळा | 2024 | ५ | २५०० |
| 3 | | | | ठोळा ते रेनकापूर | 2024 | ५ | २५०० |
| 4 | | | जिंतुर | बेलोरा ते नव्हाती | 2024 | २ | १००० |
| 5 | | | | घागरा ते कवडा | 2024 | २ | १००० |
| 6 | | | | कवडा ते कवडाफाटा | 2024 | २ | १००० |
| | | | | | | | |
| | | | | | एकूण कि.मी | 21 | 10500 |

१) अभिसरण योजनेंतर्गत नवीन कामांसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग परभणी सर्व यांच्या कडून ग्रामसभेचा ठरावासाठी पत्रव्यवहार करुन सुध्दा सहजासहजी ठराव दिले जात नाही. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामपंचायत यांना फार विनवण्या कराव्या लागतात.

२) अभिसरण योजनेंतर्गत वरील प्रमाणे सुरु असलेल्या कामांवर जॉब कार्ड धारक मजूर उपलब्ध करणे बाबत वनपरिक्षेत्र अधिकारी सोनपेठ,जिंतर व परभणी यांच्या कडन ग्रामपंचायत यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला



Scanned with OKEN Scanner

असुन सदर कामावर ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या ग्रामरोजगार सेवक यांच्या कडून जॉब कार्ड धारक मजूर उपलब्ध होत नसल्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी या कार्यालयास अवगत केले असुन रोपवन संगोपन व देखभालीचे कामे झालेली नाही.

३) वैयक्तीक लाभाअर्थीच्या शेताच्या बांधावर व शेत जमीनीवर वृक्ष लागवड कामे परभणी जिल्हात भरपुर प्रमाणत चालू असून सदर जॉब कार्ड धारक मजूर हे त्याकामावर जात असल्याने अभिसरण अतर्गत असलेल्या कामावर मजुर उपलब्ध होत नाही.

४) औघागिक क्षेत्र, बागायत्ती क्षेत्र, नागरी क्षेत्र या ठिकाणी मोठया प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अशा क्षेत्रा लगत असणा-या रोपवनात अभिसरण योजने अंतर्गत जॉब कार्ड धारक मजूर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी रोपवन कामे करण्यासाठी बाहेरुन मजुर आणुन कामे पुर्ण करावी लागतील.

५) अभिसरण योजनेंतर्गत प्रचलित अॅड्रॉईड अॅपव्दारे मग्रारोहयो अंतर्गत मजुरांची अंतर्गत मजुरांची दैनंदिनी हजेरी अपलोड करताना काही भागात नेटवर्क मिळत नाही. तसेच कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरुन जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजूर बोलवुन त्यांची हजेरी अपलोड करुन मोबाईल कॅमेराव्दारे छायाचित्र अॅड्रॉईड अॅप मध्ये अपलोड करावे लागते. त्यासाठी काम करतांना मजूर पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत. दिवस भरात दोनदा हजेरी घ्यावी लागते. हजेरी घेण्यास तांत्रिक अडचण आली तर मजुरांची हजेरी लागत नाही.

६) अभिसरण योजने अंतर्गत कामे करतांना मजुरांची कमतरता, मस्टर वरील मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी दिवसातुन २ वेळा ऑनलाईन सांकेतीक स्थळावर फोटो घेवून हजेरी नोंदवली जाते. परंतु ग्रामरोजगार सेवक दिवसातुन २ वेळा येण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. मजुरांची हजेरी नोंदवली जात नाही व परिणामी मजुर कामावर असुनही त्यांना मजुरी देता येत नाही. त्यामुळे मजुर मजुरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.

७) मजुरांना त्यांनी केलेल्या कामांची संपुर्ण मजुरी ८ दिवसांत न मिळाल्यास ते कामावर येत नाही. त्यामुळे कामे अर्धवट राहतात व विहित वेळेत कामे पुर्ण होत नाहीत.

८) वनपरिक्षेत्रांतर्गत येणा-या क्षेत्रात ब-यापैकी परभणी,गंगाखेड,जिंतूर,सोनपेठ,पुर्णा व सेलू यांच्या अंतर्गत येणारे तालुके हे बागायती क्षेत्र असल्याने व तेथे मजुरीदर जास्त मिळत असल्याने शेती कामाकडे मजुरांचा कल जास्त असतो. तसेच वनविभागातील रोपवन कामे जास्त कष्टाची असल्याने वनविभागातील कामे करण्यात मजुर उपलब्ध होत नाहीत.

९) वनविभागातील रोपवन कामे स्थळ साधारणतः गावापासुन दुर, दुर्गम अथवा डोंगराळ क्षेत्रात असतात गावापासुन दररोज पायी चालुन घरापासुन लांब अंतरापर्यंत दुर्गम भागात मजुर मानसिकरीत्या रोपवन कामावर येण्यास तयार होत नाही. मजुर घरापासुन लांबच्या कामावर येण्यास पसंती दर्शवत नाहीत. त्याचवेळी गावात वैयक्तिक लाभ अथवा सामुहिक हिताचे काम उपलब्ध असल्यास मजुरांचा कल घराजवळील कामाकडे अधिक असतो. गावातील शेतमजुर हे शेतात काम करतांना शेतमालक मजुरांना रोज संध्याकाळी रोख पगार करतात. तसेच मजुरांना त्यांच्या घरापासुन शेतापर्यंत तथा कामापर्यंत ने-आण करणेकामी वाहतुकीची सोय शेतमालक उपलब्ध करुन देतात. त्यामुळे अभिसरण योजने अंतर्गत सहजासहजी जॉब कार्ड धारक मजुर उपलब्ध होत नाही व ते येण्यास देखील इच्छा/तयारी दर्शवीत नाहीत.

१०) मग्रारोहयो अंतर्गतचा कुशल निधी हा वेळेवर प्राप्त होत नाही त्यामुळे कुशल निधी उपलबध होत नसल्यामुळे कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.

११) याबाबत तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रव्यवहार व विचारणा केली तर सदरचा निधी आल्यावर लगेच मजुरांच्या खात्यावर मजुरी जमा होईल असे म्हणतात मात्र मजुराची मजुरी मिळत नाही



Scanned with OKEN Scanner

१२) मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होतो, मजुर कमी कामे करुन पूर्ण नगदी मजुरीची अपेक्षा करतो. उदा - लागवड कामी एक मनुष्य २५ वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतू प्रत्यक्ष कामी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पुर्ण होत नाही.

१३) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गत ची मजुरी एकाच वेळेस मिळणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत घावयाची मजुरी न मिळाल्यास मजूरी अर्धवट मिळाली यामुळे ओरडा करतात, तक्रारी करतात.

१४) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर स्त्रोत बंद झाल्यावर नाईलाज म्हणुन अभिसरणाचे कामावर येतात

१५) मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती तसेच कृषी विभागा कडुन गावात घरकुल योजना, स्वच्छता ग्रह, गूराचा गोठा उपलब्ध होतात. त्यामुळे रोपवन कामे दुर्गम क्षेत्रात/दुरवर असल्याने पायपीट करीत अभिसरण च्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

वरील सर्व अडचणींमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावित कामांची संख्या कमी प्रमाणात आहे. तरी सदर अडचणींमुळे अभिसरण योजना रद होनेस विनंती आहे.

(मनोहर के गोखले)
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण विभाग, परभणी

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र वन विभाग
वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

# विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण लातूर यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, लातूर दु.क्र.2382 – 243963 ई-मेल ddsfdlatur10@gmail.com

जा.क्र.अ/साव/आस्था/विचौ/408/2024-25 दिनांक6 /01/2025

प्रति,
मा.वनसंरक्षक
सामाजिक वनीकरण
छत्रपती संभाजीनगर

**विषय:-** अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणीबाबत.

**संदर्भ:-** वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व) यांचे दि.02/01/2025 चे प्राप्त निवेदन

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय निवेदनाव्दारे अभिसरण योजने अंतर्गत या विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व) यांनी कामांत येणा-या अडचणी खालील प्रमाणे नमुद केलेल्या आहेत.

1) अभिसरण योजने अतंर्गत नवीन कामांसाठी ग्रामसभेचा ठराव पत्रव्यवहार करुन सुद्धा सहजासहजी दिला जात नाही. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामपंचायत यांना फार विनवण्या कराव्या लागतात.

2) अभिसरण योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांवर मजुर येतो म्हणतात मात्र प्रत्यक्षात काम सुरु झाल्यावर कामावर येण्यास टाळाटाळ करतात.

3) औद्योगिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, नागरी क्षेत्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अशा क्षेत्रा लगत असणाऱ्या क्षेत्रात अभिसरण योजने अंतर्गत मजुर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी कामे करण्यासाठी बाहेरुन मजुर आणून कामे पुर्ण करावी लागतात.

4) अभिरसण योजनेअंतर्गत प्रचलित NMMD ॲपद्वारे मग्रारोहयो अंतर्गत मजुरांची दैनंदिनी हजेरी अपलोड करताना बऱ्याच भागता नेटवर्क मिळत नाही. तसेच कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरुन जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजुर बोलावून त्यांची हजेरी अपलोड करुन मोबाईल कॅमेऱ्याद्वारे छयाचित्र NMMS ॲपमध्ये अपलोड करावे लागते. यासाठी काम करताना मजुर पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत.

5) अभिसरण योजने अंतर्गत कामे करताना मजुरांची कमतरता, मस्टर वरील मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी दिवसातून 2 वेळा ऑनलाईन सांकेतीक स्थळावर फोटो घेवून हजेरी नोंदवली जाते. परंतु ग्रामरोजगार सेवक दिवसातुन 2 वेळा येण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. मजुरांची हजेरी नोंदवली जात नाही व परिणामी मजुर कामावर असुनही त्यांना मजुरी देता येत नाही. त्यामुळे मजुर मजुरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.

6) मजुरांना त्यांनी केलेल्या कामांची संपुर्ण मजुरी न मिळाल्यास ते कामावर येत नाही. त्यामुळे कामे अर्धवट राहतात व विहित वेळेत पुर्ण होत नाहीत.

7) चालु वर्षी मजुरांना मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजुर कामावर आले नाहीत त्यामुळे सप्टेंबर महिन्यापर्यंत रोप लागवडीची कामे चालू होती. तसेच त्यामुळे निंदणी कामांवरही परिणाम होऊन निंदणी कामे उशिरा झाली त्याचा परिणाम रोपवन यशस्वीतेवर होत आहे.

8) मजुरांना त्यांची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजुर वर्ग वनरक्षक व वनपाल यांचे जवळ सारखे तगादे लावतात व गावात फिरु देत नाहीत. परिणामी अभिसरण अंतर्गत कामे घेण्यास क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी वर्ग उत्सुक नाहीत.

9) विभागाअंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात बऱ्यापैकी लातूर जिल्ह्यातील लातूर/ रेणापूर/ औसा/ निलंगा/ शिरुर अनंतपाळ/ उदगीर/ जळकोट/ देवणी/अहमदपूर/ चाकुर हे तालुके बागायती क्षेत्र असल्याने व तेथे मजुरीदर जास्त मिळत असल्याने शेती कामाकडे मजुरांचा कल जास्त असतो. तसेच वनविभागातील रोपवन कामे जास्त कष्टाची असल्याने वनविभागातील कामे करण्यात मजुर उपलब्ध होत नाहीत.

10) मग्रारोहयो अंतर्गतचा अकुशल निधी हा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.

11) मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होतो. मजुर कमी कामे करुन पुर्ण नगदी मजुरीची अपेक्षा करतो. उदा. लागवड कामी एक मनुष्य 100 वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतु प्रत्यक्ष कमी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पुर्ण होत नाही.

12) एखाद्या गावात अभिसरण योजने अंतर्गत काम मंजुर असते मात्र त्या गावातील मजुर कामावर येत नाही. जे मजुर कामावर यायला तयार असतात ते पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील असतात पण त्यांना कामावर लावता येत नाही. त्यामुळे कमे अपूर्ण राहतात.

13) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गतची मजुर एकाच वेळेस मिणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी न मिळाल्यास मजूरी अर्धवट मिळाली, कमी मिळाली म्हणून ओरड करतात, तक्रारी करतात.

14) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर सर्व स्तरावर बंद झाल्यावर नाईलाज म्हणून अभिसरणाचे कामावर येतात.

15) मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती अंतर्गत त्यांच्या गावात व शेतात सिंचन, विहिरी, शेततळे, रस्ते बांधकाम यासारखे कामे उपलब्ध होतात. त्यामुळे जंगल परिसरात दुरवर पायपीट करीत अभिसरणच्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

16) या विभागाअंतर्गत सर्व परिक्षेत्रात शासन परिपत्र क्रमांत सावनि-2024/प्र.क्र.10 (भाग-1)/ फ-11 दि.04 मार्च 2024 अन्वये पुर्व पावसाळी कामापैकी खड्डे खोदण्याचे काम योजनेतून करण्यात आले. तदनंतरची सर्व कामे अभिसरण अंतर्गत करणे अपेक्षीत असल्याने वेळोवेळी मागणी नोंदवून मजूर उपलब्ध हावू शकले नाहीत. मात्र लागवडीचे काम वेळेत करणे अपेक्षीत असल्याने सदरचे काम श्रमदानातून पुर्ण करण्यात आले आहे. त्यापुढील सर्व कामांसाठी मागणी नोंदवूनही मजुर उपलब्ध होवू न शकल्याने पुढील सर्व कामे खोळंबलेली आहेत व त्याचा विपरीत परिणाम रोपवनाच्या वाढीवर झालेला आहे.

वरील सर्व नमुद अडचणीमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावीत कामांच्या अडचणीचे निराकारण करणेबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, सा.व (सर्व) यांनी विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने संदर्भिय निवेदनाची छायांकित प्रत या सोबत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(ए.आर.जाधव)
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण लातूर

प्रतिलीपी:- वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण लातूर, औसा, अहमदपूर, चाकूर,निलंगा, देवणी व उदगीर यांना त्यांचेकडील या कार्यालयास प्राप्त निवेदनाचे अनुषंगाने माहितीस्तव .

# निवेदन

लातूर दि. 02/01/2025

प्रति,

मा. विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण, लातूर

**विषय – अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणाऱ्या अडचणीबाबत..**

अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

1) अभिसरण योजने अतंर्गत नवीन कामांसाठी ग्रामसभेचा ठराव पत्रव्यवहार करुन सुद्धा सहजासहजी दिला जात नाही. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामपंचायत यांना फार विनवण्या कराव्या लागतात.

2) अभिसरण योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांवर मजुर येतो म्हणतात मात्र प्रत्यक्षात काम सुरु झाल्यावर कामावर येण्यास टाळाटाळ करतात.

3) औद्योगिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, नागरी क्षेत्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अशा क्षेत्रा लगत असणाऱ्या क्षेत्रात अभिसरण योजने अंतर्गत मजुर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी कामे करण्यासाठी बाहेरुन मजुर आणून कामे पुर्ण करावी लागतात.

4) अभिरसण योजनेअंतर्गत प्रचलित NMMD ॲपद्वसो मग्रारोहयो अंतर्गत मजुरांची दैनंदिनी हजेरी अपलोड करताना बऱ्याच भागता नेटवर्क मिळत नाही. तसेच कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरुन जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजुर बोलावून त्यांची हजेरी अपलोड करुन मोबाईल कॅमेऱ्याद्वारे छयाचित्र NMMS ॲपमध्ये अपलोड करावे लागते. यासाठी काम करताना मजुर पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत.

5) अभिसरण योजने अंतर्गत कामे करताना मजुरांची कमतरता, मस्टर वरीलं मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी दिवसातून 2 वेळा ऑनलाईन सांकेतीक स्थळावर फोटो घेवून हजेरी नोंदवली जाते. परंतु ग्रामरोजगार सेवक दिवसातुन 2 वेळा येण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. मजुरांची हजेरी नोंदवली जात नाही व परिणामी मजुर कामावर असुनही त्यांना मजुरी देता येत नाही. त्यामुळे मजुर मजुरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.

6) मजुरांना त्यांनी केलेल्या कामांची संपुर्ण मजुरी न मिळाल्यास ते कामावर येत नाही. त्यामुळे कामे अर्धवट राहतात व विहित वेळेत पुर्ण होत नाहीत.

योजना
3.1.2025

Plan

3 - JAN 2025

विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण, लातूर

03/01

Inward No. 927
Date 3/1/25
Section Plan

7) चालु वर्षी मजुरांना मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजुर कामावर आले नाहीत त्यामुळे सप्टेंबर महिन्यापर्यंत रोप लागवडीची कामे चालू होते. तसेच त्यामुळे निंदणी कामांवरही परिणाम होऊन निंदणी कामे उशिरा झाली त्याचा परिणाम रोपवन यशस्वीतेवर होत आहे.

8) मजुरांना त्यांची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजुर वर्ग वनरक्षक व वनपाल यांचे जवळ सारखे तगादे लावतात व गावात फिरु देत नाहीत. परिणामी अभिसरण अंतर्गत कामे घेण्यास क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी वर्ग उत्सुक नाहीत.

9) विभागाअंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात बऱ्यापैकी लातूर जिल्ह्यातील लातूर/ रेणापूर/ औसा/ निलंगा/ शिरुर अनंतपाळ/ उदगीर/ जळकोट/ देवणी/अहमदपूर/ चाकुर हे तालुके बागायती क्षेत्र असल्याने व तेथे मजुरीदर जास्त मिळत असल्याने शेती कामाकडे मजुरांचा कल जास्त असतो. तसेच वनविभागातील रोपवन कामे जास्त कष्टाची असल्याने वनविभागातील कामे करण्यात मजुर उपलब्ध होत नाहीत.

10) मग्रारोहयो अंतर्गतचा कुशल निधी हा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.

11) मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होतो. मजुर कमी कामे करुन पुर्ण नगदी मजुरीची अपेक्षा करतो. उदा. लागवड कामी एक मनुष्य 100 वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतु प्रत्यक्ष कमी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पुर्ण होत नाही.

12) एखाद्या गावात अभिसरण योजने अंतर्गत काम मंजुर असते मात्र त्या गावातील मजुर कामावर येत नाही. जे मजुर कामावर यायला तयार असतात ते पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील असतात पण त्यांना कामावर लावता येत नाही. त्यामुळे कमे अपूर्ण राहतात.

13) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गतची मजुर एकाच वेळेस मिणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी न मिळाल्यास मजूरी अर्धवट मिळाली, कमी मिळाली म्हणून ओरड करतात, तक्रारी करतात.

14) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर सर्व स्तरावर बंद झाल्यावर नाईलाज म्हणून अभिसरणाचे कामावर येतात.

15) मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती अंतर्गत त्यांच्या गावात व शेतात सिंचन, विहिरी, शेततळे, रस्ते बांधकाम यासारखे कामे उपलब्ध होतात. त्यामुळे जंगल परिसरात दुरवर पायपीट करीत अभिसरणच्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

16) या विभागाअंतर्गत सव्र परिक्षेत्रात शासन परिपत्र क्रमांत साववि-2024/प्र.क्र.10 (भाग-1)/ फ-11 दि.04 मार्च 2024 अन्वये पुर्व पावसाळी कामापैकी खड्डे खोदण्याचे काम योजनेतून करण्यात आले. तदनंतरची सर्व कामे अभिसरण अंतर्गत करणे अपेक्षीत असल्याने वेळोवेळी मागणी नोंदवून मजूर उपलब्ध हावू शकले नाहीत. मात्र लागवडीचे काम वेळेत करणे अपेक्षीत असल्याने सदरचे काम श्रमदानातून पुर्ण करण्यात आले आहे. त्यापुढील सर्व कामांसाठी मागणी नोंदवूनही मजुर उपलब्ध होवू न शकल्याने पुढील सर्व कामे खोळंबलेली आहेत व त्याचा विपरीत परिणाम रोपवनाच्या वाढीवर झालेला आहे.

वरील सर्व अडचणींमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावित कामांची संख्या कमी प्रमाणात आहे. तरी सदर अडचणीचे निराकरण करणेस विनंती आहे.

**वन परिक्षेत्र अधिकारी** **स्वाक्षरी**

1. श्री एस.बी. कोळी , सा.व. लातुर (उदगिर, देवणी)
2. श्रीमती व्ही. जे. आवधूतराव , सा.व. औसा
3. श्रीमती एस. जी. गित्ते , सा.व. अहमदपुर
4. श्रीमती एस. आर. चाटे , सा.व. चाकुर

उद्यमशील आम्हा सोयरे वनचरे

# विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, धाराशिव

Email: - ddsfdobad@gmail.com मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, ब्लॉक क्र.२० धाराशिव ४१३ ५०१

जा.क्र.अ/सावनि/ आस्था / 721 /2024-25 दिनांक - 02 /01 /2025

प्रति,

मा.वनसंरक्षक,

सामाजिक वनीकरण छत्रपती संभाजी नगर

विषय – अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणीबाबत..

संदर्भ- वनक्षेत्रपाल सावप सर्व यांचे दि.02.01.2025 रोजीचे निवेदन

उपरोक्त विषयास अनुसरुन वनपरिक्षेत्र अधिकारी सावप सर्व यांनी अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणी व सदर अडचणीचे निराकरण करणे बाबत लेखी निवेदन या कार्यालयास वरील संदर्भान्वये सादर केलेले आहे.

तरी सदरील निवेदनाची प्रत आपणाकडे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सोबत- वरीलप्रमाणे

(व्हि.के.करे)

विभागीय वन अधिकारी

सामाजिक वनीकरण धाराशिव

# निवेदन

धाराशिव दि.०२/०१/२०२५

प्रति,
मा.विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण धाराशिव

विषय- अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणीबाबत..

अभिसरण योजने अंतर्गत कामांत येणा-या अडचणी खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१) अभिसरण योजनेंतर्गत नवीन कामांसाठी ग्रामसभेचा ठराव पत्रव्यवहार करुन सुध्दा सहजासहजी दिला जात नाही. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामपंचायत यांना फार विनवण्या कराव्या लागतात.

२) अभिसरण योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांवर मजुर कामावर येतो म्हणतात मात्र प्रत्यक्षात काम सुरु झाल्यावर कामावर येण्यास टाळाटाळ करतात.

३) औद्यागिक क्षेत्र, बागायती क्षेत्र, नागरी क्षेत्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असल्यामुळे अशा क्षेत्रा लगत असणा-या क्षेत्रात अभिसरण योजने अंतर्गत मजूर सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी रोपवन कामे करण्यासाठी बाहेरुन मजूर आणून कामे पूर्ण करावी लागतात.

४) अभिसरण योजनेंतर्गत प्रचलित NMMS ॲपद्वारे मग्रारोहयो अंतर्गत मजूरांची दैनंदिनी हजेरी अपलोड करताना ब-याच भागात नेटवर्क मिळत नाही. तसेच कामाचा सांकेतांक (वर्क कोड) ज्या ठिकाणावरुन जनरेट केला आहे त्याच ठिकाणी मजुर बोलवुन त्यांची हजेरी अपलोड करुन मोबाईल कॅमेराद्वारे छायाचित्र NMMS ॲप मध्ये अपलोड करावे लागते. यासाठी काम करतांना मजूर पुढील भागात गेले असतील तर ते माघारी येण्यास तयार होत नाहीत. दिवस भरात दोनदा हजेरी घ्यावी लागते. हजेरी घेण्यास तांत्रिक अडचण आली तर मजुरांची हजेरी लागत नाही.

५) अभिसरण योजने अंतर्गत कामे करतांना मजुरांची कमतरता, मस्टर वरील मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी दिवसातुन २ वेळा ऑनलाईन सांकेतीक स्थळावर फोटो घेवून हजेरी नोंदवली जाते. परंतु ग्रामरोजगार सेवक दिवसातुन २ वेळा येण्यास टाळाटाळ करतात व वेळेवर हजेरी घेण्यासाठी येत नाही. मजुरांची हजेरी नोंदवली जात नाही व परिणामी मजूर कामावर असुनही त्यांना मजुरी देता येत नाही. त्यामुळे मजुर मजुरीची रक्कम मिळण्यासाठी सारखे तगादा लावतात.

शाखेचे नाव
आवक क्रमांक ____ दिनांक 2/1/2025
मुख्य लेखापाल — Mourek.A.
सहा. वनसंरक्षक

विभागीय वन अधिकारी
(सामाजिक वनीकरण)
धाराशिव

६) मजुरांना त्यांनी केलेल्या कामांची संपूर्ण मजुरी ८ दिवसांत न मिळाल्यास ते कामावर येत नाही. त्यामुळे कामे अर्धवट राहतात व विहित्त वेळेत कामे पूर्ण होत नाहीत.

७) चालु वर्षी मजुरांना मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजूर कामावर आले नाहीत त्यामुळे सप्टेंबर महिन्यापर्यंत रोप लागवडीची कामे चालु होते. तसेच त्यामुळे निंदणी कामांवरही परिणाम होऊन निंदणी कामे उशिरा झाली त्याचा परिणाम रोपवन यशस्वीतेवर होत आहे.

८) मजुरांना त्यांची मजुरी वेळेवर न मिळाल्यामुळे मजुर वर्ग वनरक्षक व वनपाल यांचे जवळ सारखे तगादे लावतात व गावात फिरु देत नाहीत. परिणामी अभिसरण अंतर्गत कामे घेण्यास क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी वर्ग उत्सुक नाहीत.

९) विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात ब-यापैकी धाराशिव जिल्हातील परंडा/ धाराशिव/ तुळजापूर/वाशी/ उमरगा/कळंब हे तालुके बागायती क्षेत्र असल्याने व तेथे मजुरीदर जास्त मिळत असल्याने शेती कामाकडे मजुरांचा कल जास्त असतो. तसेच वनविभागातील रोपवन कामे जास्त कष्टाची असल्याने वनविभागातील कामे करण्यात मजुर उपलब्ध होत नाहीत.

१०) मग्रारोहयो अंतर्गतचा कुशल निधी हा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.

११) मजुरांची एकदा ऑनलाईन हजेरी लागली की त्यांचा कामाचा वेग कमी होतो. मजुर कमी कामे करुन पूर्ण नगदी मजुरीची अपेक्षा करतो. उदा. लागवड कामी एक मनुष्य १०० वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे परंतु प्रत्यक्ष कमी लागवड करतात परिणामी दिवसाला जेवढे काम करणे गरजेचे आहे तेवढे काम पूर्ण होत नाही.

१२) एखाद्या गावात अभिसरण योजने अंतर्गत काम मंजूर असते मात्र त्या गावातील मजूर कामावर येत नाही. जे मजूर कामावर यायला तयार असतात ते पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील असतात पण त्यांना कामावर लावता येत नाही. त्यामुळे कामे अपूर्ण राहतात.

१३) मजुरांना योजना अंतर्गत व मग्रारोहयो अंतर्गत ची मजुरी एकाच वेळेस मिळणे गरजेचे आहे. त्यांना योजनांतर्गत मजुरी मिळाली व मग्रारोहयो अंतर्गत द्यावयाची मजुरी न मिळाल्यास मजूरी अर्धवट मिळाली, कमी मिळाली म्हणून ओरड करतात, तक्रारी करतात.

१४) मजुरांची शेतीची कामे संपल्यावर तसेच नगदी मजुरी मिळण्याचे इतर सर्व स्तरावर बंद झाल्यावर नाईलाज म्हणून अभिसरणाचे कामावर येतात.

१५) मजुरांना ग्रामपंचायत व पंचायत समिती अंतर्गत त्यांच्या गावात व शेतात सिंचन विहिरी शेततळे रस्ते बांधकाम यासारखे कामे उपलब्ध होतात. त्यामुळे जंगल परिसरात दुरवर पायपीट करीत अभिसरणच्या कामावर येण्यात त्यांना स्वारस्य दिसुन येत नाही.

१६) या विभागाअंतर्गत सर्व परिक्षेत्रात शासन परिपत्र क्रमांक साववि-२०२४/प्र.क्र.१० (भाग-१)/फ-११ दि.०४ मार्च २०२४ अन्वये पुर्व पावसाळी कामापैकी खड्डे खोदण्याचे काम योजनेतून करण्यात आले. तदनंतरची सर्व कामे अभिसरण अंतर्गत करणे अपेक्षीत असल्याने वेळोवेळी मागणी नोंदवून मजूर उपलब्ध होवू शकले नाहीत. मात्र लागवडीचे काम वेळेत करणे अपेक्षीत असल्याने सदरचे काम श्रमदानातून पुर्ण करण्यात आले आहे. त्यापुढील सर्व कामांसाठी मागणी नोंदवूनही मजुर उपलब्ध होवू न शकल्याने पुढील सर्व कामे खोळंबलेली आहेत व त्याचा विपरीत परिणाम रोपवनाच्या वाढीवर झालेला आहे.

वरील सर्व अडचणींमुळे अभिसरण योजने अंतर्गत सुरु असलेल्या व प्रस्तावित कामांची संख्या कमी प्रमाणात आहे. तरी सदर अडचणीचे निराकरण करणेस विनंती आहे.

| वनपरिक्षेत्र अधिकारी | स्वाक्षरी |
| --- | --- |
| १. श्री. एन.एस.पचरंडे | |
| २. श्री. बी.एम.तळेकर | |
| ३. श्री.एम.जी.डफडे | |
| ४. श्रीमती आर.आर.जमदाडे | |